cmyk

## संपादकीय

### अखेरचा निरोप ...!

अजितदादा आपल्यातून जाऊन काही तास उलटले आहेत, तरीही कार्यकर्ते आणि अवघ्या मराठीजनांचा त्यावर विश्वास बसत नाही. हे सत्य स्वीकारण्याच्या मन:स्थितीत मराठी मुलुख आजही नाही. कोणत्याही क्षणी दादांचा दूरध्वनी येईल आणि त्यांना उत्तर किंवा जाब द्यावा लागेल असेच अनुक्रमे कार्यकर्ते आणि प्रशासनाला वाटत असेल. जमेचे राजकारण करण्यासाठी अनेक चेहऱ्यांनी राजकारणात वावरावे लागणे ही सामान्य बाब आहे.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२७२ | शुक्रवार दि.३० जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### महिलेवर अत्याचार चेन्नईत हत्याकांड

चेन्नई : तामिळनाडूची राजधानी चेन्नईमध्ये अत्यंत धक्कादायक घटना घडली. बिहारमधील एका स्थलांतरित कामगारासह त्याची पत्नी आणि दोन वर्षांच्या चिमुरड्याची निर्घृण हत्या करण्यात आली. महिलेवर लैंगिक अत्याचार करण्यास विरोध केल्यामुळे आरोपींनी संपूर्ण कुटुंबाचा काटा काढला. याप्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली. मृतक कुटुंब बिहारच्या नालंदा जिल्ह्यातील रहिवासी होते.२५ जानेवारीच्या रात्री आरोपींनी त्याच्या पत्नीवर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. पतीने याला जोरदार विरोध केला असता, नराधम आरोपींनी लोखंडी रॉडने हल्ला करून त्याची हत्या केली.

### सोन्याचे दर प्रति तोळा १ लाख ८२ हजारांवर

जळगाव : सोन्याचे दर दिवसेंदिवस वाढताना पाहायला मिळत आहेत. जळगाव, येथील सुवर्ण बाजारात सोने–चांदीच्या भावात २७ जानेवारी, मंगळवारी पाच हजारांची घट झाली होती. त्यात २८ जानेवारी, बुधवारी पुन्हा २३ हजारांची, तर सोन्याच्या भावात चार हजार ७०० रुपयांची वाढ झाली. जणू भाववाढीचा उच्चांक झाला. यामुळे सुवर्ण बाजारात तेजीचे वातावरण आहे. शिवाय खरेदीदारांनी देखील सोने खरेदीकडे पाठ फिरवली आहे.सोने–चांदी आता सर्वसामान्याच्या आवाक्याबाहेर गेले आहे. मात्र, श्रीमंत गुंतवणूक करीत आहेत. आज २९ जानेवारी रोजी २४ कॅरेट सोन्याचे दर प्रति तोळ्यामागे ११,७७० रुपयांनी वाढले आहेत.

### पंजाबच्या सीमेवर घुसखोरांवर गोळीबार

नवी दिल्ली : कडाक्याची थंडी आणि दाट धुक्याचा फायदा घेऊन भारतीय सीमेत घुसखोरी करणाऱ्या पाकिस्तानी तस्करांचे मनसुबे सीमा सुरक्षा दलाने मातीस मिळवले आहेत. पंजाबच्या फाजिल्का आणि अमृतसर सीमेवर राबवलेल्या मोठ्या मोहिमेत सुरक्षा दलांनी शस्त्रास्त्रांचा मोठा साठा आणि कोट्यवधी रुपये किमतीचे हेरॉईन जप्त केले आहे. या कारवाईदरम्यान एका घुसखोराला कंठस्नान घालण्यात यश आले आहे. फाजिल्का जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय सीमेवरील बीओपी जी–जी–३ परिसरात गुरुवारी मध्यरात्री पाकिस्तानी तस्करांच्या हालचाली दिसल्या. हे तस्कर दोन मोठ्या बॅगांमधून शस्त्रे आणि ड्रग्जची खेप भारतात पाठवण्याच्या तयारीत होते.

### शशी थरूर म्हणाले आमच्यात सर्वकाही ठीक

नवी दिल्ली : काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि खासदार शशी थरूर गेल्या काही काळापासून पक्ष नेतृत्वावर नाराज असल्याची चर्चा आहे. आगामी केरळ विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, पक्षाच्या बैठकांमध्येही ते हजर नसल्याची माहिती आहे. अशातच, राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची भेट घेऊन, अंतर्गत मतभेदांच्या चर्चांना पूर्णविराम लावला. तसेच, मुख्यमंत्रिपदासाठी आपण इच्छुक नसल्याचे ठामपणे सांगितले. शशी थरूर मुख्यमंत्रिपदासाठी इच्छूक असल्याची चर्चा सुरू आहे संसदेत त्यांच्या हितांचे रक्षण करणे हेच माझे काम आहे. मुख्यमंत्रिपदाची कोणतीही महत्त्वाकांक्षा नाही.

### समीर वानखेडेंची याचिका फेटाळली

नवी दिल्ली : आयआरएस अधिकारी समीर वानखेडे यांना दिल्ली उच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. आर्यन खान दिग्दर्शित बॅड्स ऑफ बॉलिवूड या वेब सीरिजवर त्यांची प्रतिमा खराब केल्याचा आरोप करत मानहानीचा खटला दाखल केला होता. मात्र, न्यायालयाने गुरूवार दि. २९ जानेवारी रोजी हा खटला फेटाळून लावला आहे.समीर वानखेडेंनी आर्यन खान दिग्दर्शित वेब सीरिजमध्ये आपली प्रतिमा मलिन करण्यात आल्याचा आरोप केला होता. त्यांच्या मते, या सीरिजमधील काही दृश्यांमधून त्यांचा अप्रत्यक्षपणे अपमान करण्यात आला.या पार्श्वभूमीवर वानखेडेंनी मानहानीचा खटला दाखल केला.

### योद्धा गेला, आता शस्त्रे म्यान केली–मिटकरी

अकोला: ''अजितदादांमुळेच माझा राजकीय जन्म झाला. आज आमचा योद्धाच आम्हाला सोडून गेला, आता ही लढाई कोणासाठी लढायची? आम्ही आता आमची शस्त्रे टाकली आहेत,'' अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनाचे वृत्त समजताच मिटकरी यांना आपला शोक अनावर झाला. म्हणून मी देवगिरी बंगल्यावर गेलो आणि कुणालाही न सांगता दादांची चप्पल चोरून आणली. त्या चपलेची मी माझ्या घरात पूजा केली,'' ही आठवण सांगताना मिटकरी सुन्न झाले होते.

# कृषी क्षेत्रात सरासरी साडेचार टक्के वार्षिक वाढ

## अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडून संसदेत आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादर

**दिल्ली । वृतसंस्था**

**गेल्या पाच वर्षांत कृषी क्षेत्राने सरासरी ४.४ टक्के वार्षिक वाढ नोंदवली असून, आर्थिक वर्ष २०२५–२६ च्या दोन तिमाहीत कृषी क्षेत्राची वाढ ३.५ टक्के राहिल्याचे आर्थिक पाहणी अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. यामध्ये पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि फलोत्पादन या क्षेत्रांचा या वाढीत महत्त्वाचा वाटा आहे, असे नमूद करण्यात आले आहे.**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गुरुवार (ता.२९) रोजी संसदेत आर्थिक सर्वेक्षण अहवाल २०२५–२६ सादर केला. या सर्वेक्षणात भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्रांमधील कामगिरी आणि आव्हानांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. कृषी आणि सलंग्न क्षेत्रांचा देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात जवळपास एक–पंचमांश वाटा आहे, मात्र देशातील ४६.१ टक्के मजूर या क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे हे क्षेत्र देशाच्या एकूण आर्थिक



विकासाचा कणा असल्याचे आर्थिक सर्वेक्षण अहवालात नमूद करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्रांमधील कामगिरी आणि आव्हानांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. कृषी आणि सलंग्न क्षेत्रांचा देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात जवळपास एक–पंचमांश वाटा आहे, मात्र देशातील ४६.१ टक्के मजूर या क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे हे क्षेत्र देशाच्या एकूण आर्थिक विकासाचा कणा असल्याचे आर्थिक सर्वेक्षण अहवालात नमूद करण्यात आले आहे.चांगल्या मॉन्सून आणि सरकारच्या कृषी ▶▶ पान २ वर

### बदलत्या हवामानाचा शेतीला फटका...

हवामानातील लहरीपणा, वाढते तापमान आणि टोकाच्या हवामान घटनांमुळे पिकांच्या उत्पादनावर परिणाम होत आहे. मॉन्सूनवर अवलंबून असलेल्या भागांमध्ये पाण्याची टंचाई ही मोठी समस्या ठरत असून त्याचा शेती क्षेत्राला फटका बसत असल्याचे सर्वेक्षणात म्हटले आहे.

# महाराष्ट्र हळहळला; लाडके अजितदादा अनंतात विलीन

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री अजित पवार अनंतात विलीन झाले आहेत. दादांना अखेरचा निरोप देण्यासाठी महाराष्ट्र लोटला होता. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अजित दादांवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. आपल्या दादाला निरोप देताना उपस्थित कार्यकर्त्यांनी अजित दादा अमर रहे च्या घोषणा



दिल्या. देशाचे गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील सर्व वरिष्ठ नेते आणि अधिकारी उपस्थित होते. अंत्यसंस्कारावेळी कार्यकर्त्यांच्या अश्रुंचा बांध फुटला त्यांनी 'परत परत या अजित दादा परत या' अशी घोषणाबाजी ▶▶ पान २ वर

## अजित पवारांच्या अपघाताची केंद्रीय संस्थेकडून चौकशी सुरू

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमान अपघाताची चौकशी आता केंद्रीय संस्थेकडून होणार आहे. विमान अपघात तपास ब्युरो या संस्थेने अपघाताची चौकशी सुरू केली असून त्याचा अहवाल आल्यानतंर तो राज्य सरकारलाही पाठवण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी या अपघाताची चौकशी करावी असे पत्र केंद्रीय उड्डाण मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांना लिहिलं होतं. त्यानंतर केंद्रीय मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात ही माहिती दिली.

विमान अपघात तपास ब्युरो यांनी तपास सुरु केला आहे. विमानातील



ब्लॅकबॉक्स ताब्यात घेण्यात आला आहे. विमान अपघात आणि घटना नियमांनुसार, तपास सुरु केला आहे. तो पारदर्शी आणि कालबद्ध पद्धतीने होईल.या अपघातातील सर्व टेक्निकल रेकॉर्डस, ऑपरेशनल तपशील, घटनास्थळावरील तथ्य याचा तपास केला जात आहे. भविष्यात अशा घटना होऊ नयेत, या आपल्या विनंतीची मंत्रालयाने दखल घेतली असून, चौकशी अहवाल ▶▶ पान २ वर

## युजीसीच्या नव्या नियमास सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

देशातील महाविद्यालय आणि विद्यापीठांसाठी कार्यरत असलेल्या युजीसीने लागू केलेल्या नव्या निमयमाने चांगलाच वाद निर्माण झाला होता. या नियमाला देशभरातली अनेक विद्यार्थी संघटना, संस्थांनी विरोध दर्शवल्यानंतर आता सरकार एक पाऊल मागे आल्याचं दिसून येत आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, दिव्यांग आणि महिलांच्या संरक्षणार्थ युजीसीने एक नवा नियम जारी केला होता. मात्र, आता विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नव्या नियमांना सर्वोच्च न्यायालयातकडून स्थगिती देण्यात आली आहे.

अशाने वेगवेगळ्या प्रवर्गाची वेगेवगळी वसतिगृह तयार होतील, अशी चिंता न्यायाधीशांनी व्यक्त केली. तसेच, केंद्र ▶▶ पान २ वर

## जिप.पस निवडणूक कार्यक्रमात बदल

**मुंबई । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला आहे. ५ फेब्रुवारी २०२६ ऐवजी आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान; तर ७ फेब्रुवारी २०२६ ऐवजी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होईल.

राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा ▶▶ पान २ वर

### असा असेल मतदान कार्यक्रम ?

आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. त्यामुळे जाहीर प्रचाराची समाप्ती ५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजता होईल. संबंधित ठिकाणी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल. निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात ११ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रसिद्ध केली जातील.

# आता राष्ट्रवादीच्या पालणहार सुनेत्राताई

## दादांच्या राजकीय वारसावरुन पडद्यामागे हालचाली

**मुंबई । प्रतिनिधी**



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे अनंतात विलीन झाले आहेत. परंतु त्यांच्या निधनानंतर आता त्यांचा राजकीय वारसदार कोण असा प्रश्न विचारला जात आहे. त्यासंबंधी पडद्यामागे राजकीय हालचालीही सुरू झाल्या आहेत. त्यातच आता सुनेत्रा पवारांनाच उपमुख्यमंत्री करा अशी एक मागणी जोर धरताना दिसत आहे. त्यातच पक्ष पातळीवर सुनिता ताई याच आता राष्ट्रवादीच्या पालनहार आहेत त्यांच्याकडेच सर्व जबाबदारी दिल्यानंतर पक्ष एकसंघ राहील अशी ही चर्चा आहे.

राज्यसभेवर असलेल्या सुनेत्रा पवार यांना पक्षाच्या हंगामी अध्यक्ष करावे आणि त्यांनी बारामती विधानसभेची पोटनिवडणूकही लढवावी अशी मागणी केली जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली.अजित पवारांच्या अकाली निधनामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी पोकळी ▶▶ पान २ वर

### भाजपची भूमिका काय असेल?

“ अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादीच्या नेत्यांशी चर्चा करून पुढची भूमिका, पुढचं पाऊल टाकलं जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी या आधीच स्पष्ट केलं आहे. केंद्रात आणि राज्यात बळकट सत्ता असल्यामुळे अजित पवारांच्या राष्ट्रवादीची सूत्रं कुणाकडे जावीत हे ठरवण्यामध्ये भाजप निर्णायक भूमिका घेऊ शकते.आपल्याला सोईचं होईल,तशी भूमिका घेणाऱ्याच्या हाती राष्ट्रवादी पक्षाची सूत्रं राहतील यासाठी भाजपकडूनही प्रयत्न केला जाण्याची शक्यता आहे.

## धनंजय मुंडे यांच्या नावे आक्षेपार्ह पोस्ट

### सायबर पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दाखल

**बीड । प्रतिनिधी**

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या नावाने फेसबुक या सोशल मीडिया साईटवर खोटे अकाउंट काढून त्यावरून आक्षेपार्ह पोस्ट करण्यात आल्याने धनंजय मुंडे यांच्या वतीने संबंधित फेक अकाउंट विरोधात रीतसर कायदेशीर फिर्याद दाखल करण्यात आली आहे. संबंधित फेक खाते काढणाऱ्या व्यक्तीस आता ही चांगलेच महागात पडणार असून, सायबर पोलिस संबंधितास गुन्हा दाखल करून बेड्या ठोकणार आहेत. धनंजय मुंडे हे सोशल मीडियावर नेहमीच सक्रिय ▶▶ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: १२.५० क्विंटल | २,६१० | ३,८३० | ३,१८० |
| ज्वारी/हायब्रिड: ४२.०० क्विंटल | १,७०० | ४,००१ | ३,३९६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १३६.५० क्विंटल | ४,४४१ | ७,८५१ | ७,३९१ |
| उडीद : ४.५० क्विंटल | ४,८५० | ६,३०० | ५,५७५ |
| बाजरी: २८.०० क्विंटल | २,१५१ | ३,२६१ | २,७५४ |
| मुग:०.५० क्विंटल | ६,००१ | ६,००१ | ६,००१ |
| सोयाबीन: १८४.०० क्विंटल | ४,९०० | ५,३०० | ५,१७१ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,००० | ६,७०० | ६,१३३ |


# मातेचे दु:ख मातेलाच ठावे

## ‘घाईत येतोस आणि परत जातोस...आता कधी येशील?’

**मुंबई । मधुकर भावे**

अजितदादा गेले... सर्वांनाच एक दिवस जायचे आहे... पण, दादांना आलेले मरण असे यायला नको होते... हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने अनेकजण अचानक जातात... आमचे डॉ. गोवर्धनलाल पाराशर चहा पिता–पिता असेच अचानक गेले. दादांचे जाणे हे अचानक नाही... अत्यंतू क्रूर अशा काळाने त्यांच्यावर झडप घातली. दादांच्या मृत्यूचा धक्का इतका तीव्र होता की, अख्खा महाराष्ट्र हादरून गेला... सर्वांची एकच भावना होती की, ‘अरेरे’... असे मरण नको यायला होते...’ शिवाय अगदी बारामतीच्या वेशीजवळ येऊन दादा अचानक गेले... बारामतीच्या त्या धावपतट्टीवर दादांचे विमान आतापर्यंत इतक्यावेळा उतरले आहे की, दादांना तो हवाई मार्ग पाठ झाला होता... दादा ‘पायलट’ असते तर त्यांनी काळोखातही ते विमान उतरवले असते... इतकी ती धावपट्टी दादांना माहिती होती... यापूर्वी विमान अपघातात माधवराव शिंदे असेच गेले... तो झटकाही मोठा होता. पण, त्यांचे छोटे विमान वादळात सापडले होते... तेही प्रचाराकरिताच जात होते. त्या घटनेलाही आता १५ वर्षे झाली. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री राजशेखर रेड्डी यांचे हेलिकॉप्टर तर बेपत्ता होऊन जंगलात कोसळले. त्यांचाही मृत्यू भयानक होता. लष्करप्रमुख बिपिन रावत हे विमान अपघातातच गेले. पण दादांनी बारामतीच्या वेशीला जणू हात लावलेला होता... अगदी मिनीटात– दोन मिनिटात त्यांचे विमान उतरले असते तर त्यांच्यासाठी गाड्या सज्ज होत्या... ते निवडणूक प्रचाराला निघाले होते... एका दिवसात प्रचार आटोपून संध्याकाळी मुंबईला परतणार होते... पण... नियती किती क्रूर आहे.

शरद पवारसाहेबांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केल्यानंतर ▶▶ पान २ वर



cmyk

## अग्रलेख

# अखेरचा निरोप ...!

अजितदादा आपल्यातून जाऊन काही तास उलटले आहेत, तरीही कार्यकर्ते आणि अवघ्या मराठीजनांचा त्यावर विश्वास बसत नाही. हे सत्य स्वीकारण्याच्या मन:स्थितीत मराठी मुलुख आजही नाही. कोणत्याही क्षणी दादांचा दूरध्वनी येईल आणि त्यांना उत्तर किंवा जाब द्यावा लागेल असेच अनुक्रमे कार्यकर्ते आणि प्रशासनाला वाटत असेल. जमेचे राजकारण करण्यासाठी अनेक चेहऱ्यांनी राजकारणात वावरावे लागणे ही सामान्य बाब आहे, हे मांडले जाणारे गृहीतक अजितदादांनी नेहमीच खोटे ठरवले. दिलखुलास, बेधडक, स्पष्टवक्तेपणा, शब्दाचा पक्केपणा, धाडसी आणि अभ्यासू वृत्ती ही त्यांची काही स्वभाववैशिष्ट्ये. दोन चेहऱ्यांनी वावरणे हा त्यांचा स्वभाव नव्हताच. त्यामुळे अनेकदा वादही झडत. त्याची राजकीय किंमतही त्यांनी अनेकदा मोजली. पण त्यांना त्याची फिकीर नसायची. कारण ते जसे होते तसेच सर्वांच्या अनुभवास येत राहिले. पण त्यात चूक झाली याची त्यांना खात्री पटली तर माफी मागण्याचा उमदेपणाही त्यांच्याकडे होता. आघाडी धर्म पाळतानाही युतीतील पक्षाला जाहीरपणे खडेबोल सुनावण्याचा रोखठोकपणा त्यांच्याकडे होता. त्यासाठीची जोखीम घ्यायची त्यांची नेहमीच तयारी आढळायची. कार्यकर्त्यांचे मोहोळ हा कोणत्याही राजकीय नेत्याचा एका अर्थी प्राणच मानला जाऊ शकेल.

राजकारणात नेत्याला कार्यकर्ते मोठे करतात. किमान अजितदादा तरी तसे मानायचे. याचाच प्रत्यय म्हणून अवघा महाराष्ट्रच नाहीतर देशभरातून या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप द्यायला बारामतीत जनसागर लोटला. दादांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत कार्यकर्ते जपले. माणसे जपली. माध्यमांनी अथवा विरोधकांनी युती–आघाडी किंवा निवडणुकांशी संबंधित विचारलेल्या प्रश्नांविषयी बोलताना, कार्यकर्त्यांना फार नाराज करणे मनाला पटत नाही, अशीच भावना ते नेहमी व्यक्त करत. हा वारसा त्यांनी त्यांचे काका शरद पवार यांच्याकडून घेतला आणि तो जपला होता. दांडगा जनसंपर्क हे त्यांचे आणखी एक स्वभावैशिष्ट्य. दीर्घ राजकीय कारकिर्दीत त्यांनी अर्थ, जलसंपदा, कृषी, ऊर्जा, ग्रामविकास, नियोजन अशा अनेक खात्यांची मंत्रीपदे भूषवली. उपमुख्यमंत्री म्हणूनही दीर्घकाळ काम केले. खाते कोणतेही असो, त्या विषयाचा त्यांचा अभ्यास पक्का असायचा. प्रशासकीय कामकाजाची त्यांना सखोल माहिती असायची. त्यांना माणसांची पारख असायची. त्या बळावरच त्यांची प्रशासनावर पक्की मांड होती. त्यांच्यासमोर एखादा विषय आला आणि त्यांना त्याची माहिती नसायची असे अधिकाऱ्यांच्या कधीही अनुभवास आले नाही. किंबहुना, इतरांपेक्षा कांकणभर अधिकच त्यांच्या अभ्यास असायचा. त्यामुळेच लोकांनी किंवा कार्यकर्त्यांनी सांगितलेले काम होणार आहे की नाही हे ते ठामपणे सांगू शकत. अचूक निर्णय घेत. ते प्रभावीपणे अंमलात आणत. समोर आलेल्या फाइल्स साठवून ठेवू नका, त्यावर निर्णय घ्या असेच ते अधिकाऱ्यांना सांगत. राजकारणात अलीकडच्या काळात अभ्यासू वृत्ती हा दुर्मिळ गुण असणाऱ्या मोजक्या लोकांपैकी ते एक होते. त्यांची कार्यक्षमता विलक्षण होती. झपाट्याने ते काम करायचे. त्यांचा दिवस भल्या पहाटे सुरू व्हायचा. पहाटे वातावरण आणि माणसाचे मन देखील शांत असते. विचार किंवा काम वेगाने होते असे ते म्हणत.

कोणत्याही परिस्थितीत ते त्यांच्या जिवलग मित्रांच्या मागे उभे राहिले. मग ते मित्र राजकारणातील–समाजकारणातील अथवा वैयक्तिक आयुष्यातील असोत. पक्ष किंवा त्यांचे नेते सत्तेसाठीच राजकारण करतात. राजकीय महत्वाकांक्षा फलीभूत व्हावी, या उद्देशाने त्यांनी भारतीय जनता पक्षाशी युती केली. त्यावेळी राजकीय धुरंधरांसह जनतेला कमालीचा धक्का बसला होता. पण युती केली म्हणून अजितदादांनी त्यांच्या वैचारिक भूमिकेशी कधीही तडजोड केली नाही.

शाहू–फुले–आंबेडकर यांच्या विचारांच्या वारशाला त्यांनी कधीही तडा जाऊ नाही, त्या भूमिकेशी ते ठाम राहिले. अधिवेशन अथवा अन्य कोणत्याही कारणांसाठी त्यांचे नागपूरला जाणे व्हायचे. तेव्हा आघाडीचा धर्म या गोंडस नावाखाली देखील संघाच्या मुख्यालयाला भेट देणे त्यांनी नेहमी टाळले. त्यांनी नेहमीच विकास आणि विकासाचेच राजकारण केले. म्हणूनच बारामतीमधून ते सलग सात वेळा निवडून येत राहिले. त्यांच्या जाण्याने लाखो कार्यकर्त्यांचा आणि त्यांच्या पक्षाचा आधारवड अचानक उन्मळून पडला आहे. यापुढे दादा अशी हाक कोणाला मारायची या भावनेने कार्यकर्ते सैरभैर झाले आहेत. आपल्या लाडक्या दादाला निरोप देण्यासाठी लाखोंचा जनसागर यामुळेच बारामतीत दिसून आला. प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू होते आणि दादा आता पुन्हा दिसणार नाहीत, अशी बोच प्रत्येकाच्या चेहऱ्यावर होती. जमलेल्या कुठल्याच कार्यकर्त्याकडे वा नेत्याकडे शब्द नव्हते. मनाला हुरहुर लावून गेलेले दादा यांना अखेरचा निरोप देताना, जमलेला जनसागर सद्गदीत झाला यातच दादाचे मोठेपण दिसून येते.

---

## दादा...


दादा गेल्याची बातमी
मनाला नव्हती पटली,
टीव्ही बघितल्यावरच
ती पुन्हा खरी वाटली.
विमान अपघाताने दादा
गेले होते जग सोडून,
कित्येक जण सांगत होते
अगदी ढसाढसा रडून.
महाराष्ट्राचा दादा हरपला
हे जनतेच्या मुखातले शब्द,
सर्वत्र तळतळ, हळहळ
अन्? महाराष्ट्र झाला स्तब्ध.
दिलखुलास अन्? परखड नेता
ओळख त्यांची राहिली,
अखंड महाराष्ट्राने दादांची
राजकीय कारकीर्द पाहिली.
इथल्या शेती मातीशी
सदैव नाळ जोडलेला,
अभ्यासू व दूरदृष्टीचा
प्रशासक त्यांच्यात दडलेला.
तुमचं महाराष्ट्रातील योगदान
जनता विसरणार नाही बरका,
असा नेता पुन्हा होणे नाही
अजित दादा सारखा...!
अजित दादा सारखा...!

:::::: कवी ::::::
संजय शेळके
रा.पांढरी ता.आष्टी जि.बीड
मो.९९७५२२८५८५

---

## महामंडलेश्वर त्रिविक्रमानंद सरस्वतीजी यांचे बीडमध्ये काल्याचे कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**



**बीड शहरातील नगर नाका परिसरातील संकल्पसिद्धी हनुमान मंदिर, आदर्श गणेशनगर येथे दि. २३ जानेवारी २०२६ पासून अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या भक्तिभावात सुरू आहे. या सप्ताहाची सांगता शुक्रवार दि. ३० जानेवारी २०२६ रोजी होणार आहे.**

सप्ताहाच्या समारोपप्रसंगी महामंडलेश्वर स्वामी त्रिविक्रमानंद सरस्वतीजी तसेच इंदिवसिनी देवी, पिंपळनेर यांचे सकाळी ११ ते १ या वेळेत काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. या कीर्तनासाठी परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून त्यानंतर अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमासाठी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. या पवित्र धार्मिक कार्यक्रमास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संकल्पसिद्धी हनुमान तरुण मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

---

## स्व.अजितदादा पवार यांना अखेरचा निरोप धनंजय मुंडेंनी अर्पण केली भावपूर्ण आदरांजली

**बारामती । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या अंत्यविधीपूर्वी माजी मंत्री व आमदार धनंजय मुंडे यांनी त्यांच्या पार्थिवावर पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहिली. या वेळी त्यांनी आपल्या भावना शब्दांत व्यक्त करताना भावूक होत दादांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.**



"तुमच्या धनंजयचा अखेरचा दंडवत दादा महाराष्ट्राचा दादा माणूस आज अनंतात विलीन होत असताना अत्यंत जड अंतःकरणाने आदरांजली अर्पण करीत आहे. दादा आपल्यात नाहीत, यावर अजूनही विश्वास बसत नाही. तुमच्याविना आम्ही पोरके, अपुरे आणि अर्धवट झालो आहोत. नियती इतकी क्रूर कशी असू शकते? भावपूर्ण आदरांजली दादा" अशा शब्दांत धनंजय मुंडे यांनी आपल्या नेते व मार्गदर्शक असलेल्या स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली. दरम्यान, बारामती येथे शोकाकुल वातावरणात लाखोंच्या जनसागराच्या उपस्थितीत स्व. अजितदादा पवार यांना अखेरचा निरोप देण्यात आला. राज्याच्या विविध भागातून आलेल्या नागरिकांनी आपल्या लाडक्या नेत्याला अश्रूंनी निरोप दिला. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अंत्यदर्शनासाठी उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली. स्व. अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली असून त्यांच्या आठवणी जनतेच्या मनात कायम राहतील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

---

## अर्थसंकल्पापूर्वीच खाद्यतेल कडाडले

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान, सोयाबीनच्या दरात झालेली वाढ, खाद्यतेलावर २० टक्के आयात शुल्क आणि डॉलरच्या वाढत्या किमती यांचा एकत्रित परिणाम राज्यातील खाद्यतेलाच्या बाजारावर दिसून आला आहे. दरम्यान आगामी अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी सादर होणार असून यापूर्वीच खाद्यतेलाच्या दरात मोठी वाढ होत असल्याने नागरिकांच्या खिशाला मोठी झळ बसण्याची शक्यता अर्थ तज्ज्ञांनी वर्तविली आहे.**

ब–याच दिवसांपासून स्थिर असलेले खाद्यतेलाचे भाव अचानक वाढले आहेत. सण–उत्सव नसतानाही झालेली ही दरवाढ सर्वसामान्यांच्या खिशाला चटका देणारी ठरत आहे. विशेषत: शेंगदाणा तेलाच्या दरात सर्वाधिक वाढ नोंदविली गेली आहे. शेंगदाणा तेल २०० रुपये किलोवर पोहोचले आहे. युक्रेन–रशिया संघर्ष, इंडोनेशियाची पामतेल निर्यात धोरणे आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील किमती यांचा थेट परिणाम भारतातील खाद्यतेल आयातीवर होत आहे. परिणामी देशांतर्गत बाजारात दर वाढत आहेत. साधारणत: सणासुदीच्या काळात खाद्यतेलाच्या दरात वाढ होते. मात्र, यंदा कोणताही मोठा सण नसतानाही तेलाच्या दरात लक्षणीय वाढ झाली आहे. किरकोळ बाजारात दर आठवड्याला दरवाढ होत असल्याचे चित्र आहे.बाजारात शेंगदाणा तेलाचे दर प्रतिकिलो २०० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. मागील दोन महिन्यांत शेंगदाणा तेलात वाढ झाली असून ग्राहकांना पर्यायी तेलांकडे वळावे लागत आहे.गेल्या अनेक महिन्यांपासून खाद्यतेलाचे दर जवळपास स्थिर होते. मात्र, जानेवारीपासून अचानक दरवाढीचा ट्रेंड सुरू झाला असून, ही वाढ टप्प्याटप्प्याने होत आहेअतिवृष्टीमुळे सोयाबीन व शेंगदाण्याचे उत्पादन घटले, सोयाबीनच्या हमीभावात वाढ, खाद्यतेलावर २० टक्के आयात शुल्क, डॉलर महागल्याने आयात खर्च वाढला, जागतिक बाजारातील अस्थिरता आदी कारणे दिसून येत आहेत.

---

# पान १ वरून...

### कृषी क्षेत्रात सरासरी साडेचार

धोरणामुळे देशातील अन्नधान्य उत्पादन सतत वाढत असल्याचा दावाही करण्यात आला आहे. सर्वेक्षण अहवालानुसार, २०२४–२५ मध्ये अन्नधान्य उत्पादनाने ३,५७७.३ लाख टनाचा टप्पा गाठला आहे. अन्नधान्य उत्पादन मागील वर्षापेक्षा २५४.३ लाख टन अधिक असून ही वाढ मुख्यतः तांदूळ, गहू, मका आणि भरडधान्य पिकांच्या उत्पादनात वाढीमुळे झाली आहे, असे सांगितले आहे. कृषी क्षेत्राच्या एकूण सकल मूल्यवर्धनात फलोत्पादनाचा वाटा सुमारे ३३ टक्के इतका आहे. आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये देशातील फलोत्पादन उत्पादन ३६२.०८ दशलक्ष टनांपर्यंत पोहोचले आहे. तर याच कालावधीतील अंदाजित अन्नधान्य उत्पादन ३२९.६८ दशलक्ष टनांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे फलोत्पादनाचा वाटा वाढत आहे, असे निरीक्षण अहवालात नोंदवले आहे. आर्थिक सर्वेक्षण अहवालात स्पष्ट करण्यात आले की, "विकसित भारताच्या उद्दिष्टपूर्तीसाठी कृषी क्षेत्र केंद्रस्थानी असेल. समावेशक विकास साधण्यात आणि कोट्यवधी लोकांच्या उपजीविकेत सुधारणा करण्यात कृषी क्षेत्राची निर्णायक भूमिका राहील." असे सांगितले. परंतु हवामान बदलामुळे निर्माण होणारी आव्हाने अधिक गंभीर होत आहे, असा इशाराही सर्वेक्षणात देण्यात आला आहे.

---

### अजित पवारांच्या अपघाताची

येताच त्यादृष्टीने उपाययोजना करण्यात येतील. या चौकशीत महाराष्ट्र सरकारचेही सहकार्य आम्हाला मौल्यवान असेल. स्थानिक प्रशासनाची यात मदत लागेल. हा संपूर्ण चौकशी अहवाल राज्य सरकारलाही आम्ही देऊ. अजित पवार यांच्यासारख्या अतिशय वरिष्ठ नेत्याचा विमान अपघातात मृत्यू झाला. त्यांच्यासह आणखी ४ जणांना यात प्राण गमवावे लागले. हा अपघात नेमका कशामुळे घडला, याच्या कारणांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी केली होती. तसेच भविष्यात असे अपघात घडणार नाहीत, यादृष्टीने तातडीने पाऊले उचलण्यात यावी, अशीही पत्रातून मागणी केली होती.राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांवर बारामतीत शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. विमान अपघातात बारामती इथे अजित पवारांचा काल मृत्यू झाला. त्यानंतर संपूर्ण राज्य दुःखात बुडालं. लाखो चाहते, समर्थक, सर्वपक्षीय नेते यांच्या उपस्थितीत अजित पवारांवर बारामतीच्या विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात अंत्यसंस्कार करण्यात आले.

---

### महाराष्ट्र हळहळला;

केली. अजित दादा यांचे पार्थिव सकाळी काटेवाडी येथील निवासस्थानी आणण्यात आले होते. बारामतीकरांनी काळजावर दगड ठेवत शेवटचं दर्शन घेतलं, त्यानंतर फुलांनी सजवलेल्या ट्रकमधून दादांची अंत्ययात्रा विद्या प्रतिष्ठानच्या मैदानाकडे नेण्यात आलेली, तेव्हा रस्त्याच्या दोन्ही बाजूल मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळाली. विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर लाखोंच्या संख्येने जनगसागर लोटल्याचं पाहायला मिळाला. पार्थ आणि जय पवार या दोघा पुत्रांनी दादांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. अजित पवार यांच्या अचानक निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. या धक्क्याने सर्वच जण हादरले आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस .उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , धनंजय मुंडे सह मंत्रिमंडळातील सर्व मंत्री लिकांप्रतिनिधी विविध पक्षाचे अध्यक्ष पदाधिकारी देशभरातील अनेक दिग्गजांनी अजित पवारांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.काल सकाळी आठच्या सुमारास अजित पवार मुंबईवरुन बारामतीला जाण्यासाठी निघाले. पावणे नऊच्या सुमारास त्यांच्या चार्टर्ड विमानाला बारामतीत अपघात झाला. लँडिंग करत असताना विमान धावपट्टीपासून ५० मीटर अंतरावर अपघातग्रस्त झालं. त्यानंतर विमानाचा स्फोट झाला. अपघात इतका भीषण होता की विमानातील पाचही जणांना त्यांचा जीव गमवावा लागला. मृतदेहांची अवस्था गंभीर होती. त्यांची ओळख पटत नव्हती. अजित पवार यांच्या मृतदेहाची अवस्था त्यांच्या हातात असलेल्या घड्याळामुळे पटली. जोपर्यंत माझे हातपाय हलतात ना, तोपर्यंत तुमचं भलंच करीन. मी काम करून दाखवलं. मी कामाचा माणूस आहे. मी कामाचाच माणूस आहे,' असं अजित पवार म्हणायचे. यातला शब्दनशब्द खरा ठरला. अजित पवार शेवटच्या श्वासापर्यंत काम करत राहिले. कामाचा माणूस ही बिरुदावली सार्थ ठरवून गेले. ज्या बारामतीच्या मातीनं दादांना घडवलं, उपमुख्यमंत्रिपदापर्यंत नेलं, त्या मातीला दादांनी खूप काही दिलं. त्यांनी घेतलेला वसा अखेरपर्यंत कायम राहिला.

---

### जिप.पस निवडणूक

परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १३ जानेवारी २०२६ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे इत्यादी टप्प्यांच्यी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत.सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकांसाठी ३१ जानेवारी २०२६ च्या पुढे फक्त दोन आठवड्यांची मुदत वाढ दिली आहे. पण उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनाने राज्यात २८ जानेवारी २०२६ ते ३० जानेवारी २०२६ पर्यंत दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना ३१ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करतील, अशी माहिती जारी करण्यात आली आहे.

---

### युजीसीच्या नव्या नियमास सर्वोच्च

सरकारकडून नियमांचा मसुद्यावर पुनर्विचार करण्याबाबत सुतोवाचही न्यायालयाकडून करण्यात आले आहेत.देशभरात विद्यापीठ अनुदान आयोगाचे नियम वादग्रस्त ठरले होते, तसेच सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल करण्यात आली. आता, सर्वोच्च न्यायालयाने या नव्या नियमावलीला स्थगिती दिली आहे. युजीसीने जानेवारी २०२६ मध्ये "प्रोमोशन ऑफ इकुटी इन हायर एजुकेशन इन्स्टिट्यूशन्स रेगुलेशन्स , २०२६ " नावाचे नवे नियम जारी केले, जे कॉलेज आणि विद्यापीठांमध्ये एस्सी , एसटी आणि ओबीसी विरोधातील जातीय भेदभाव रोखण्यासाठी आहेत. हे नियम १३ जानेवारी २०२६ पासून लागू झाले असून, त्यामुळे देशभरात मोठा वाद सुरू झाला आहे. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दखल घेत संबंधित नियमावली लागू करण्यास स्थगिती दिली असून केंद्र सरकारला महत्त्वाचे सूतोवाच केले आहेत. सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेत, याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी युक्तिवाद करताना म्हटले की, संविधनाने सर्वांनाच संरक्षण दिलं असून सर्वच नागरिकांचे रक्षण झाले पाहिजे. मात्र, युजीसीचा नवा नियम संभ्रमात टाकणारा असून भेदभाव करणारा आहे. या नियमांत केवळ ओबीसी, एसी आणि एसटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्याच संरक्षणाचा मुद्दा आहे. प्रत्येक संस्थेला इक्विटी कमिटी, इक्वल अपॉर्च्युनिटी सेंटर इक्विटी स्क्वॉड आणि २४७ हेल्पलाइन स्थापन करावी लागेल; तक्रार मिळाल्यावर २४ तासांत प्राथमिक कारवाई आणि १५ दिवसांत अहवाल द्यावा लागेल. भेदभावाची व्याख्या विस्तारित केली असून, ओबीसी, एसी आणि एसटी च्या विरुद्ध थेट किंवा अप्रत्यक्ष भेदभाव दंडनीय; उल्लंघन झाल्यास संस्थेची मान्यता रद्द होऊ शकते. हे २०१२ च्या जुन्या नियमांचे सुधारित आवृत्ती असून, ओबीसी ला एसटी /एसी नव्याने समाविष्ट केले गेले.

---

### धनंजय मुंडे यांच्या

असतात, मात्र त्यांच्या नावाने फेसबुकवर ( ) खोटे अकाउंट काढून त्यावरून काही आक्षेपार्ह पोस्ट करण्यात आल्याने बीड सायबर पोलिसात धनंजय मुंडे यांच्या सूचनेवरून स्वीय सहाय्यक तथा खाजगी जनसंपर्क अधिकारी सुदर्शन (सुधीर) सांगळे यांनी रीतसर फिर्याद दिली आहे. सदर फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात येणार असून संबंधितास अटक करण्यासाठी पुढील तपास सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक श्री. निलेश केळे करीत आहेत. धनंजय मुंडे यांनी याबाबत बीडचे पोलिस अधीक्षक श्री. नवनीत कावत यांच्याशी देखील संपर्क करून कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या असून, संबंधितास लवकरच अटक करून योग्य कारवाई करण्याचे आश्वासन श्री. नवनीत कावत यांनी दिले आहे. धनंजय मुंडे यांच्या नावाने चालवण्यात येणारे सदरील खाते हे बनावट असून कुणीतरी जाणीवपूर्वक बदनामी करण्याच्या उद्देशाने सुरू केले असून, संबंधित खात्याचा किंवा त्यावरील पोस्टचा आमच्याशी कोणताही संबंध नसून त्यावरून करण्यात येणाऱ्या आक्षेपार्ह पोस्टची जबाबदारी ही संबंधित फेक खाते धारकाची असल्याचे श्री. सांगळे यांनी आपल्या फिर्यादीत म्हटले आहे. सायबर विभागाच्या कार्यपद्धतीनुसार संबंधित अज्ञात खाते धारका विरोधात प्राप्त फिर्यादीवरून भारतीय दंड संहितेच्या माहिती तंत्रज्ञान कायदा तसेच लोकप्रतिनिधींच्या नावाने खोटे खाते उघडून त्यावरून बदनामी केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करून तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस निरीक्षक श्री. निलेश केळे यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान सदर फेसबुक खाते १. या इमेल आयडी वरून कुणीतरी शेळके नामक व्यक्ती चालवत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून सायबर पोलिस अधिक तपास करत आहेत.

---

### आता राष्ट्रवादीच्या पालणहार

निर्माण झाल्याचं चित्र आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची जोरदार चर्चा सुरू असताना, तशी पावलंही पडत असताना अजित पवारांचे निधन झाले. त्यामुळे आता त्यांचा राजकीय वारसदार कोण याची चर्चा सुरू झाल्याचं दिसतंय.राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल आणि छगन भुजबळ यांनी सुनेत्रा पवारांची भेट घेतली आणि त्यांच्याशी चर्चा केली. तर नरहरी झिरवाळांनी सुनेत्रा पवार यांनाच उपमुख्यमंत्री करा अशी मागणी केली. त्यामुळे सुनेत्रा पवार यांना राष्ट्रवादीचे हंगामी अध्यक्ष केलं जाण्याची शक्यता असल्याची चर्चा सुरू आहे. सुनेत्रा पवार या सध्या राज्यसभेच्या खासदार आहेत. तर अजित पवारांचे दोन्ही पुत्र, पार्थ आणि जय पवार हे सक्रिय राजकारणात नसले तरी पडद्यामागून पक्षसंघटनेमध्ये सक्रिय असल्याचं दिसतंय. असं असलं तरी या तिघांनाही राजकारणाचा तितकासा अनुभव नाही. अजित पवारांच्या निधनानंतर एक उपमुख्यमंत्रिपद सध्या रिक्त आहे. पुढच्या सहा महिन्यात बारामती विधानसभा पोटनिवडणूकही घ्यावी लागणार आहे. त्यामुळे पक्षाचं नेतृत्व करायचं असेल तर सुनेत्रा पवारांनी बारामतीची पोटनिवडणूक लढवावी आणि उपमुख्यमंत्रिपद स्वीकारावं अशी एक मागणी जोर धरताना दिसत आहे. राष्ट्रवादीमध्ये फुट पडल्यानंतर प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे यांच्यासह अनेक बडे नेते अजित पवारांसोबत राहिले. आता दोन्ही राष्ट्रवादींच्या एकीकरणाची चर्चा सुरू असतानाच अजित पवारांचे अचानक निधन झालं.राष्ट्रवादीच्या एकीकरणासाठी स्वतः अजित पवार हे आग्रही होते असं म्हटलं जात आहे. शरद पवारांच्या वाढदिवसादिवशीच, म्हणजे १२ डिसेंबर रोजीच दोन्ही राष्ट्रवादींचे एकीकरण करून पवारसाहेबांना सरप्राईज देण्याची इच्छा अजित पवारांची होती, पण काही कारणामुळे ते शक्य झालं नसल्याचं वक्तव्य अंकुश काकडे यांनी केलं. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादीचे एकीकरण करून त्याचं नेतृत्व पुन्हा एकदा शरद पवारांच्या हाती देणं हा एक पर्याय असल्याची चर्चाही सुरू आहे.

---

### मातेचे दु:ख मातेलाच

सकाळी ८ वाजता राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात पोहचून पक्षासाठी राबलेले दादा होते. वयाच्या अवघ्या ३२ व्यावर्षी ते लोकसभेत खासदार म्हणून पोहोचले. पवारसाहेब हे १९९१ साली महाराष्ट्रात मुख्यमंत्री म्हणून आले. अजितदादांना त्यांनी लोकसभेच्या पोट निवडणुकीत पहिल्यांदा खासदार केले. दादा आमदार नंतर झाले... दादांनी सुरुवात संसदीय राजकारणापासून केली आणि मग ते विधानमंडळात आले. पण राबणाऱ्या नेत्यांमध्ये दादांऐवढा राबणारा नेता दुर्मिळ... झपाटल्यासारखे ते काम करायचे... पवारसाहेबांद्दल त्यांना परम आदर होता. पवारसाहेब ज्या व्यासपीठावर असायचे त्या व्यासपीठावर भाषण करायलाही दादा संकोच करायचे. प्रशासनावर त्यांचा वचक, धाक, दरारा होता... कारण त्यांना 'फाईल' समजत होती. प्रशासनातील अधिकारीमंडळी त्यांना 'चकवे' देवू शकत नव्हती. त्यांचा अभ्यासही होता... निरिक्षणही चांगले होते.... विचासणरणी सकारात्मक होती. 'न होणारे काम नियमात बसवून कसे करून घ्यायचे', याची एक खूबी त्यांना माहिती होती. त्यामुळे दादांनी एकदा 'हो' म्हटले की, काम होणारच... ही सामान्य माणसाला खात्री होती. त्यातूचन दादांचे नेतृत्त्व लोकाभिमूख होत गेले... त्यांची भाषा, त्यांची भाषणे व्यवहारी होती. ती कार्यकर्त्यांच्या मनाला थेट भिडायची... प्रशासनाला त्यांची भिती नव्हती.. त्यांचा दरारा असायचा... 'भिती' शब्दाचा अर्थ वेगळा आहे... 'दरारा'शब्दाचा अर्थ वेगळा आहे...

महाराष्ट्रात वसंतराव पाटील हे 'वसंतदादा' झाले... ते 'दादा' घरातले वाटायचे... पण हे दादा एक वेगळे रसायन होते. बाळासाहेब देसाई यांच्यानंतर गेल्या ६५ वर्षांत प्रशासनाला दरारा वाटणाऱ्या नेत्याचे नाव कोणी विचारले तर त्याचे नाव 'अजितदादा' हेच आहे. शरद पवारसाहेबांचा आवाका दादांपेक्षा खूप मोठा.... त्यांच्याविषयीचा प्रशासनाला पूर्ण आदर... पण दादांचे व्यक्तिमत्त्व वेगळे घडले. अशा या दादांचा मृत्यू इतका भीषण झाला की, तो चटका कालपासून अस्वस्थ करून गेलाय... तडक उठून बारामतीला जावे, असे सतत वाटायचे... पण ज्या गर्दीचे पूर्वी आकर्षण वाटायचे... त्या गर्दीत आता उभे राहण्याची किंवा फार चालण्याची ताकद राहिलेले नाही. निसर्ग नियमाने अशी हतबलता येते.... महाराष्ट्रातील गेल्या ६५ वर्षांतील तीन पिढ्यांचे मी राजकारण पाहतोय.... महाराष्ट्रातील असा एकही प्रसंग नाही.... ज्याचा मी साक्षीदार नाही... यशवंतराव, भाऊसाहेब हिरे, मालोजीराव निंबाळकर ही पिढी पाहिली.... वसंतदादा, शंकरराव चव्हाण, राजारामबापू, बाळासाहेब देसाई, मधुकरराव चौधरी, प्रतिभाताई पाटील, यशवंतराव मोहिते, हे कर्तबगार मंत्री पाहिले... नंतरच्या पिढीत शरद पवारांची पिढी आहे.... आणि मग विलासराव– अजितदादा ही पिढी आहे... विलासराव आणि आर. आर. आबा हे ही अकाली गेले... पण, त्यांच्या भीषण दुखण्याने समाजाची एक मानसिकता तयार झाली होती... सर्वांच्या प्रार्थना सुरू होत्या... पण त्या सफल झाल्या नाहीत... माधवराव शिंदे, गोपिनाथ मुंडे, अजितदादा यांचा मृत्यू असा नाही... विनोबांनी मृत्यूला 'महोत्सव' म्हटले... पण दादांचा मृत्यू हा 'महोत्सव' म्हणता येणार नाही.. हा 'दु:खोत्सव'च आहे.

१२ डिसेंबर २०१० रोजी शरद पवारसाहेब ७० वर्षांचे झाले तेव्हा त्यांच्यावर 'एकमेव' असा एक ग्रंथ तयार केला... सुनील तटकरे यांनी त्यासाठी पुढाकार घेतला होता... त्यासाठी बारामतीला गेलो... किरण गुजर यांनी पवारसाहेबांचे सगळे प्रकल्प दाखवले... 'मती गुंग करणारी बारामती' हा विस्तृत लेख त्यातूनच तयार झाला. झटकन मनात आले की, दादांच्या आईंनाही भेटावे... विद्या प्रतिष्ठानचे विश्वस्त किरण गुजर आणि मी दादांच्या घरी गेलो... श्रीमती आशाताई अनंतराव पवार म्हणजेच दादांच्या आई. काट्याच्या वाडीला त्या असतात... अजित पवार यांनी आपल्या जुन्या घराच्या जागेवरच नवीन घर बांधले त्या घरामध्ये आशाताई राहतात... त्यांनी शरद पवारसाहेबांबद्दल सांगितले की, 'ते माझे धाकटे दीर... त्यांच्यामुळेच सगळे पवार कुटुंबीय दिवाळीत बारामतीला चार दिवस आम्ही एकत्र राहतो... सगळ्या कुटुंबीयांना एकत्र आणणारी प्रत्येक दिवाळी अशी आनंदाची असते... पण निघायची वेळ आली की, हूरहूर लागते... मग मी पुन्हा घरी एकटी... पण, मनाला मी समजावले आहे... घराण्यातील सर्वांनीच आपला वेळ समाजासाठी दिलेला आहे... आणि माझा मुलगा अजित तरी काय.... त्यानेही राजकारणाला वाहून घेतलेय... काट्याच्या वाडीला आला तरी पाच–पंचवीस कार्यकर्त्यांना घेऊनच येतो... घाईघाईतच येतो... मी आपली त्याची वाट बघत असते.... निघायची वेळ आली की, कार्यकर्त्यांना सांगतो, 'अरे, आईला पाच मिनीटे तरी भेटायला जाऊ द्याल की नाही....?' मग स्वयंपाक घरात येतो... बसतो... 'काही खा' म्हटले तर 'नको–नको' म्हणतो... 'जातो –जातो' म्हणतो... आणि पाठमोरा होऊन बाहेर पडतो.... तो पाठमोरा झाला की, मी आपली पाठमोरी त्याच्याकडे पाहात राहाते... 'समाजाकरिता काम करतो आहेस ना... कर बाबा... घाईत येऊन जातोस... आता कधी येशील? असे विचारते... माझे तुला आशीर्वाद आहेत...' असे म्हणते...

आमची सुनबाई सुनेत्रा. ती मात्र येते आणि तिने बघता बघता गाव बदलून टाकले... पण दादाचे काही येणे फारसे होत नाही... माझं जाणे होत नाही... तो आला की लगेच निघाला... मग त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी अशी पाहात राहते... 'आता पुन्हा कधी येशील रे....' मनाशीच म्हणत राहते...

आज त्या दिवसाची मुलाखत आठवली... आता आशाताई दारात उभ्या राहून 'त्यांचा लाडका अजित कधी येईल,' त्याची वाट पाहात असतील का?... त्या मातेचे दु:ख काय असेल... पवारसाहेबांचे दु:ख आणि अजितदादांच्या मातेचे दु:ख महाराष्ट्राला समजू शकेल का?

राजकारण गेले चुलीत... असं म्हणण्याची वेळ आली आहे. देवा, तू असशील तर असे मरण कोणत्याही राजकीय नेत्याला येऊ देऊ नकोस... आणि त्याच्या आईला वाट पहायला लावू नकोस.... आज आणखी काय म्हणता येईल...

दादा, तुमच्या अंत्यसंस्काराच्या वेळी फार चालण्याची शक्ती नसल्यामुळे त्या गर्दीत यायला मनाची तयारी झाली नाही.. मनाने तिथेच आहे...

तुमची–माझी शेवटची भेट ही जांबोरी मैदानावर तुम्ही माझा सत्कार करूनच झालेली आहे... जावेद अख्तर आणि मी....

आज तुम्ही नाहीत.... तुम्ही परत येणार नाहीत, हे माहिती आहे... त्यामुळेच विनोबांनी मृत्यूला 'महोत्सव' म्हटले तरी तुमचा हा मृत्यू महाराष्ट्रासाठी 'दु:खोत्सव'च आहे... दादा, भावपूर्ण श्रद्धांजली... पवारसाहेब, तुमच्यासोबत नेहमीच राहिलोय... या दु:खात तुमच्या सोबत आहे.

---

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. ३० जानेवारी २०२६



# पाटोद्यात युरियाचा काळाबाजार

## २६६ रुपयांचे खत ५०० ला, शेतकरी विशाल गर्जे यांची प्रशासनाकडे धाव

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात युरिया खताची चढ्या दराने विक्री होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. महा सांगवी येथील शेतकरी विशाल गर्जे यांनी याप्रकरणी तहसीलदार आणि कृषी अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली असून, खत विक्रेत्यांकडून शेतकऱ्यांची मोठी लूट होत असल्याचा आरोप केला आहे.

नेमके प्रकरण काय?

सध्या शेतीकामांसाठी युरिया खताची मोठी आवश्यकता आहे. याचाच फायदा घेत पाटोदा शहरातील खत विक्रेते कृत्रिम टंचाई निर्माण करत आहेत. शासनाने युरियाच्या एका गोणीची किंमत २६६ रुपये निश्चित केली असताना, प्रत्यक्षात दुकानदार शेतकऱ्यांकडून ५०० रुपये उकळत असल्याचे विशाल गर्जे यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे:

दुकानदार खत उपलब्ध नसल्याचे सांगून टंचाई निर्माण करत आहेत आणि गरजेपोटी विचारणा केल्यास दुप्पट किमतीने विक्री करत आहेत. सर्वच दुकानदार संगनमताने ५०० रुपयांना गोणी विकत असल्याने सामान्य शेतकरी हवालदिल झाला आहे, असे गाऱ्हाणे विशाल गर्जे यांनी मांडले आहे.

प्रशासनाकडून कारवाईची मागणी:

युरिया खताचा हा काळाबाजार तात्काळ थांबवून दोषी दुकानदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, शासनाने युरियाचा पुरेसा साठा उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. या तक्रारीनंतर आता कृषी विभाग आणि तहसील प्रशासन काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शेतकरी विशाल गर्जे यांची प्रतिक्रिया

प्रतिगुणी २६५ ला स्थानी ५०० ला विक्री होत आहे पाटोदा शहरातील ६३.८६५ टन शिल्लक असताना कृषी अधिकारी यांना विचारले असता त्यांनी उत्तरे दिली आहेत मी विशाल गर्जे यांनी म्हटले आहे माहिती अधिकार अंतर्गत विचारले असताना माहिती दिली नाही कृषी अधिकारी व सर्व दुकानदार संगणमत करून शेतकऱ्यांची लूटमार करत आहेत अशी प्रतिक्रिया विशाल गर्जे शेतकरी दिले आहे

## थोडक्यात



### जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मोगरा येथे प्रजासत्ताक दिन साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मोगरा येथे दि २६ जानेवारी सोमवार रोजी प्रजासत्ताक दिन उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रभातफेरीने झाली. त्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण पार पडले. राष्ट्रगीत, संविधान उद्देशिकेचे वाचन व देशभक्तीपर गीतांनी कार्यक्रमास गौरव प्राप्त झाला.विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक सादरीकरणातून संविधान मूल्ये, नागरिक कर्तव्ये आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात आला. स्पर्धांतील विजेत्यांना बक्षिस वितरण करून गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यात आले. उपस्थित पालक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामपंचायत प्रतिनिधी व शिक्षणप्रेमी नागरिकांनी कार्यक्रमाच्या यशात सक्रिय सहभाग नोंदविला. या उपक्रमाद्वारे शाळेने शैक्षणिक उत्कृष्टतेसोबत नागरिकत्व मूल्यांची रुजवणूक करण्याची आपली धोरणात्मक बांधिलकी अधोरेखित केली. कार्यक्रमाचे आयोजन सुयोग्य नियोजन, कार्यक्षम अंमलबजावणी आणि सर्व भागधारकांच्या समन्वयातून यशस्वीरीत्या पूर्ण झाले.

### कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी



कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त सकाळी ०८:०५ वाजता बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले

यावेळी बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे संचालक वीरेंद्र सोळंके,माजी सभापती नितिनराव नाईकनवरे, उद्धव नाईकनवरे मनोज जगताप, संजय कचरे, आबाजी भोसले,नंदकिशोर सजगणे, अमोल जाधव, भगवानराव आ ा ग े ,प्र भ ा क र हो के ,जु ग ल कि शो र नावंदर,कादिर पठाण सचिव हरिभाऊ सवणे, खरेदी विक्री संघाचे संचालक अशोकराव हूबाले,सह.सचिव रवींद्र नाईकनवरे, लेखापाल उद्धव फपाळ, संख्याकी मोतीराम चव्हाण,निरीक्षक सुनिल सवणे,कोषपाल मिनानाथ मुळे,व.लिपिक अमोल आगे,प्रतवारीकार अतुल होके व सर्व कर्मचारी,व्यापारी,शेतकरी,हमाल,मापाडी उपस्थित होते.

## युवकांनी प्रत्यक्ष कृतीतून समाजविकासात योगदान द्यावे - दत्तात्रय क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, स्वच्छता आणि राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण होते. युवकांनी समाजाच्या विकासासाठी प्रत्यक्ष कृतीतून योगदान द्यावे, असे प्रतिपादन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, बीडचे प्रकल्प अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर यांनी केले.



देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मंगळवार,दि.२७ रोजी मौजे शिवणी येथे 'शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापन व पडीक जमीन विकासासाठी युवा' या थीमखाली आयोजित सातदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे होत्या,तर प्रमुख पाहुणे म्हणून समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.दिनेश काकडे, तुलसी आय.टी. कॉलेजचे प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे उपस्थित होते. यावेळी प्रा.निकाळजे म्हणाले की, युवकांमध्ये देशभावना जागृत होऊन देशभक्तीतून समाजसेवा घडावी, हा राष्ट्रीय सेवा योजनेचा मुख्य उद्देश आहे. महात्मा गांधीजींच्या संकल्पनेतून राष्ट्रीय सेवा योजनेची मुहूर्तमेढ रोवली गेली असून, ही सामाजिक जाणिवेची चळवळ आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव व सामाजिक बांधिलकी निर्माण करणे हे तिचे प्रमुख ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात डॉ.बेद्रे यांनी 'खेड्याकडे चला' या गांधीजींच्या विचारांची मांडणी करत ग्रामीण सक्षमीकरणाचे महत्त्व स्पष्ट केले. खेडे हा भारताचा कणा असून, ग्रामीण विकासाशिवाय शहरी प्रगती शक्य नाही. शेतकऱ्यांकडून मिळणाऱ्या कच्च्या मालामुळे देश चालतो. स्वच्छता, पर्यावरण संवर्धन व वृक्षसंवर्धनावर भर देत स्वतःपासून बदल घडवण्याचे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.वृषाली लोखंडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार श्वेता वंजारे यांनी मानले. या प्रसंगी उपप्राचार्य प्रा.सय्यद शहाणा यांचेसह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच शिवणी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीच्या क्रीडा महोत्सवाचा प्रारंभ

माजलगाव । प्रतिनिधी

फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी अँड ज्युनिअर कॉलेज, माजलगाव यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दहाव्या क्रीडा महोत्सवाची सुरुवात दि. २७ जानेवारी २०२६, सोमवार रोजी सकाळी ९ वाजता हनुमान चौक येथून विद्यार्थ्यांच्या भव्यदिव्य संचलनाने करण्यात आली. अत्यंत शिस्तबद्ध, एकसंघ व प्रेरणादायी अशा या प्रभात फेरी संचलनात परेड, स्केटिंग, डंबेल्स आणि मॅरेथॉन या क्रीडा प्रकारांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. या प्रभात फेरीतून एकता, संघभावना, शिस्त आणि क्रीडाभावना यांचे जिवंत दर्शन माजलगावकरांना अनुभवता आले.या नेत्रदीपक प्रभात फेरीने संपूर्ण माजलगाव शहराचे लक्ष वेधून घेतले होते.



या क्रीडा महोत्सवाच्या संचनलनाचे उद्घाटन माजलगाव विधानसभा अध्यक्ष मा. नारायण (अण्णा) डक, उपनगराध्यक्ष मा.सहाल भैय्या चाऊस,डॉ.शंकर जुजगर बबनरावजी सरवदे, डॉ.राहुल जेथलिया यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी पत्रकार बंधू मा.उमेश मोगरेकर, दिलीप झगडे, हरीश यादव, कुणाल दुगड, राजरत्न डोंगरे, तसेच नगरसेवक भारत जिजा होके यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीचे चेअरमन पांडुरंग चांडक प्राचार्या सौ. सारिका बजाज सौ.ऐश्वर्या चांडक उपप्राचार्य सचिन गायकवाड व ज्योती बनसोडे क्रीडा शिक्षक सुखदेव माने आकाश पवार स्केटिंग व डंबेल्स मार्गदर्शक कृष्णा गायकवाड

कराटे मास्टर चंद्रमणी डोंगरे रमेश बाहेती यांनी या प्रभात फेरीच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. यानंतर शाळेच्या प्रांगणात खऱ्या अर्थाने क्रीडा महोत्सवाला सुरुवात झाली. क्रीडा महोत्सवाचे प्रास्ताविक करताना चेअरमन पांडुरंग चांडक यांनी, शिक्षणाबरोबरच शिस्तप्रिय, जिद्दी व चिकाटी असलेले उद्याचे खेळाडू घडवण्याचे कार्य फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी सातत्याने करत राहील, असे मनोगत व्यक्त केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सौ. ममता शिंगाडे यांनी केले. माजलगाव शहरात अशा भव्यदिव्य आणि शिस्तबद्ध क्रीडा प्रभात फेरीचे प्रथमच दर्शन झाल्यामुळे नागरिकांत फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी चे कौतुक झाले.

## बीएएमएस प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांची शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, संभाजीनगर येथे शैक्षणिक भेट



माजलगाव । प्रतिनिधी

प.पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, माळीपारगाव, ता. माजलगाव, जि. बीड येथील बी.ए.एम.एस. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी), संभाजीनगर येथे रचना शरीर (-परीृ) विषयाशी संबंधित चीीशीी, उ्ळीीशलींळेप क्षश्रश्र व इेपश इरपज्ञ यांना शैक्षणिक भेट दिली.

या शैक्षणिक भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना रचना शरीर विषयाचे प्रत्यक्ष व सखोल ज्ञान मिळवून देणे हा होता. ॲनाटॉमी म्युझियममध्ये विविध जतन केलेले अवयव, मॉडेल्स तसेच शैक्षणिक नमुन्यांची माहिती विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्वक घेतली. उ्ळीीशलींळेप क्षश्रश्र मध्ये प्रत्यक्ष विच्छेदन प्रक्रियेचे निरीक्षण करून मानवी शरीररचनेची समज अधिक दृढ झाली. तसेच इेपश इरपज्ञ मध्ये विविध हाडांचे नमुने, त्यांची ओळख व शैक्षणिक महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. एनसीआयएसएम (छउखडच्) च्या अभ्यासक्रमानुसार सदर शैक्षणिक भेट ही विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य शैक्षणिक उपक्रम व अंतर्गत मूल्यमापन (खपींशीपरश्र चेपळीेळपस) चा एक भाग असल्यामुळे ही शैक्षणिक ट्रीप आयोजित करण्यात आली होती. ही शैक्षणिक भेट रचना शरीर विभागाचे प्रमुख डॉ. अतुल बिर्ला यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अधिव्याख्याता डॉ. साबेर शेख यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनात यशस्वीरीत्या पार पडली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, संभाजीनगर येथील ॲनाटॉमी विभाग प्रमुख डॉ. अर्चना कल्याणकर, अधिव्याख्याता डॉ. हिजाब खान तसेच सर्व कर्मचारी वर्ग यांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने शेवटी मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.



## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली

किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे निधन झाल्यामुळे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व श्रद्धांजली वाहण्यात आली. प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी श्रद्धांजलीपर बोलताना उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे जनसामान्यांत मिसळणारे व सामान्य माणसाची दखल घेणारे नेतृत्व होते असे मत व्यक्त केले. तसेच उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी उपस्थितांना उपमुख्यमंत्री अजित दादांचे कार्य, कर्तृत्व व बीड जिल्ह्याचे पालक मंत्री म्हणून केलेल्या कार्याच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी निवेदन प्रोफेसर डॉ. अशोक लाखे यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. सुभाष वायाळ तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

## पान ६ वरुन...

### कुरकुटे परिवारातर्फे वडवणी

श्रीमती अंजली आंधळे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

सवासिनींना हळदी कुंकू लावून वान देऊन तिळगुळ घ्या गोड गोड बोला म्हणत होम मिनिस्टरच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली यामध्ये वेगवेगळे खेळ घेण्यात आले त्यामध्ये विजेत्या महिलांना आकर्षक असे पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते देऊन त्यांच्या सन्मान करण्यात आला. हळदी कुंकू सोहळा व होम मिनिस्टर कार्यक्रम आनंद,उत्साह आणि आपुलकीने भरून गेला होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. प्रियंका कुरकुटे यांनी केले तर बहारदार सूत्रसंचालन कु.शिवानी बडे यांनी केले.या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या वडवणी शहरात सर्वत्र या कार्यक्रमाचे कौतुक होत आहे.

### गटविकास अधिकाऱ्यांच्या

व या तक्रारीमध्ये एमआरईजीएसच्या बेकायदेशीर कामाची चौकशी करून दोषी वरती कारवाई करण्यात यावी अशीही मागणीही केली होती. मधुकर पानसंबळ यांच्या तक्रार अर्जावरून शिरूरचे गटविकास अधिकारी यांनी दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी चौकशी समिती नियुक्त केली व या समितीला या कामाची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेशही दिले होते. मात्र चौकशी समितीतील कृषी विस्तार अधिकारी बी.एस. मिसाळ व नरेगाचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी एस.एस.उबाळे यांनी कामी पुरतीच उदासीनता दाखवून या चौकशीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. यामुळे मधुकर पानसंबळ यांनी संबंधित अधिकाऱ्याकडून चौकशी होत नसल्याने दि. २२ जानेवारी रोजी शिरूरच्या गटविकास अधिकाऱ्यांना पुन्हा निवेदन देऊन चौकशीसाठी उपोषण करण्याचा इशारा दिला होता. मात्र पानसंबळ यांच्या या इशाऱ्याकडे शिरूर पंचायत समिती कार्यालयाने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याने केल्याने याच गायरान डोंगरावरती निर्जन ठिकाणी काटेरी झाडाखाली पानसंबळ यांनी दि. २५ जानेवारीपासून उपोषण सुरू केले होते. विशेष म्हणजे गट विकास अधिकाऱ्यांना निवेदन देऊनही दि. २५ जानेवारी ते २८ जानेवारीपर्यंत या चार दिवसात पानसंबळ यांच्या उपोषणाकडे शिरूर पंचायत समिती कार्यालयाचा एकही अधिकारी कर्मचारी फिरकला नव्हता. काही सामाजिक कार्यकर्त्यांकडून व त्याचबरोबर शिवसेना उबाठा गटाकडून काही पदाधिकाऱ्यांनी गट विकास अधिकारी उद्धव सानप यांना या उपोषणाचे गांभीर्य निदर्शनास आणून दिले त्यानंतर गटविकास अधिकारी यांनी दि. २८ जानेवारी रोजी उगलमुगले नामक कर्मचाऱ्याकडे लेखी पत्र देऊन चौकशी समितीकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषी वरती कारवाई केली जाईल असे लेखी आश्वासन दिल्यानंतर ज्येष्ठ शिवसेनेचे कार्यकर्ते हरी मामा खेडकर, उगलमुगले यांच्या मध्यस्थी नंतर मधुकर पानसंबळ यांनी हे उपोषण तूर्तास मागे घेतले आहे.

## जय भवानी महाविद्यालयात काव्यवाचन स्पर्धा

पाटोदा । प्रतिनिधी



येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने दिनांक १४ जानेवारी ते दिनांक २८ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.त्या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सोळा विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये प्रथम क्रमांक स्नेहा लांडे या विद्यार्थिनीने पटकावला तर द्वितीय क्रमांक अस्मिता मुंडे या विद्यार्थिनीने मिळवला. तृतीय क्रमांक श्रावणी कांडेकर या विद्यार्थिनीने मिळवला.

सदर स्पर्धेत निसर्ग विषयक, प्रेम विषयक , सामाजिक कविता सादर करण्यात आल्या.याशिवाय, भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत २२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. 'मराठी असे आमची मायबोली' या विषयावर ही निबंध स्पर्धा संपन्न झाली. यामध्ये प्रथम क्रमांक अश्विनी शिरोळे या विद्यार्थिनीने पटकावला, द्वितीय क्रमांक साधना गोंदकर या विद्यार्थ्यांनीने मिळवला, तर तृतीय क्रमांक शेख रीना या विद्यार्थ्याने मिळवला.या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. सुनील जाधव हे होते. या प्रसंगी बोलतांना ते म्हणाले की, मराठी भाषेतील साहित्य हे विद्यार्थ्यांनी अभ्यासले पाहिजे. समाज मूल्य असणारी कविता विद्यार्थ्यांमध्ये रुजली पाहिजे, असे मतही त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास प्रमुख भाष्यकार म्हणून नाटककार प्रा. बापू घोक्षे हे उपस्थित होते. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने नष्ट होत जाणाऱ्या बोलीभाषेविषयी चिंता व्यक्त करून मराठी भाषेतील विद्रोही कविता कशी असते, याचे आपल्या नाट्यपूर्ण शैलीतून त्यांनी सादरीकरण केले. आपली भाषा, आपला आत्मा असल्याचे सांगत भाषा संवर्धनाची जबाबदारी तरुण पिढीने सांभाळलीच पाहिजे, असे मार्गदर्शनही त्यांनी केले. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी मराठी भाषा पंधरवडा निमित्त घेतलेल्या स्पर्धेचे कौतुक करून मराठी भाषा संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे असे सांगून एक कविता आपल्या गेय आवाजात सादर करून कवी विठ्ठल वाघ यांची आठवण यानिमित्ताने विद्यार्थ्यांना करून दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रामकृष्ण प्रधान यांनी केले तर आभार क्रीडा विभाग प्रमुख प्रा.डॉ. प्रवीण शिलेदार यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. खैसर शेख, प्रा. बाळासाहेब जोशी, प्रा. अशोक देवगुडे यांनी परिश्रम घेतले.

## संत खंडूजी बाबा विद्यालयाची एक दिवसाची शैक्षणिक सहल उत्साहात

बीड । प्रतिनिधी



विद्यार्थ्यांच्या सहलीसाठी शाळेतील पालकांनी उपस्थित राहून सहलीसाठी जाणाऱ्या मुलांच्या बसचे उद्घाटन करून रवाना केल्या तसेच १८ जानेवारी या दिवशी प्रस्थान करून अहिल्यादेवी जन्मस्थळ चौंडी,गहिनीनाथ गड,हनुमान गड, खंडेरायाचे मंदिर कुसळंब,मोठादेवी आदी स्थळांना भेटी देऊन माहिती घेतली व या सहलीचे नियोजन श्री. राऊत की.पी सर श्री.भालेकर आय.डी श्री.राऊत जी.एन तसेच सखी-सावित्री अध्यक्षा श्रीम.रूपाली दडपे व शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती. भालेकर मॅडम यांनी सहल पूर्णत्वास नेण्यास परिश्रम घेतली व सहल आनंदात पार पाडली.

cmyk

# सरकारच्या आश्वासनानंतर किसान मोर्चाला स्थगिती

## तीन महिन्यात मागण्या पूर्ण न झाल्यास पुन्हा आंदोलनाचा इशारा

नाशिक : नाशिकहून मुंबईकडे निघालेल्या किसान लाँग मार्चला अखेर स्थगिती देण्यात आली आहे. शहापूर-भातसा फाटा परिसरात मुक्काम ठोकून असलेल्या मोर्चेकऱ्यांची आज नाशिकचे जिल्हाधिकारी''आयुष प्रसाद'' यांनी भेट घेतली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी मोर्चेकऱ्यांच्या मागण्यांबाबत शासन स्तरावर झालेल्या चर्चेची माहिती दिली तसेच त्यांचे अर्ज स्वीकारले. शासनाच्या आश्वासनानंतर किसान मोर्चाला स्थगिती दिली आहे. तीन महिन्यात मागण्या पूर्ण न झाल्यास पुन्हा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

शासनाकडून सर्व मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आला असून, त्याच्या अंमलबजावणीसाठी तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. या आश्वासनानंतर किसान लाँग मार्चला स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच मोर्चेकऱ्यांकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दोन मिनिटांचे मौन पाळून शोक व्यक्त करण्यात आला. दरम्यान, दिलेल्या कालावधीत मागण्या पूर्ण न झाल्यास






पुन्हा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही मोर्चेकऱ्याचे नेतृत्य करणारे माजी आमदार जेपी गावित यांनी दिला आहे . सध्या मोर्चा स्थगित असून सर्व मोर्चेकरी आपापल्या गावी परतीच्या मार्गावर निघाले आहेत. प्रशासनाकडून मोर्चेकऱ्यांसाठी बसची व्यवस्था करण्यात आली होती तसेच मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

प्रमुख मागण्या कोणत्या? - पश्चिम वाहिनी नद्यांच्या उपनद्यांवर जे.पी. सिमेंट काँक्रिटचे आदर्श बंधारे उभारून स्थानिक शेतकरी तसेच खान्देश व मराठवाड्यातील शेती. उद्योग व औद्योगिक वसाहतींसाठी पाणी उपलब्ध करून द्यावे. अपूर्ण व गाळाने भरलेले बंधारे तात्काळ पूर्ण करावेत. - वनाधिकार कायदा २००६ अंतर्गत आदिवासींच्या ताब्यात असलेली दहा एकर हक्काची जमीन त्वरित लाभधारकांना द्यावी. स्वतंत्र सातबारा तयार करून पती-पत्नीचे नाव कब्जेदार सदरी नोंदवावे. वनपट्टाधारकांना मिळालेल्या जमिनीत विहीर, जमीन सपाटीकरण, फळबाग लागवड, सोलर, मोटर यांसह केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ द्यावा. प्रलंबित फॉरेस्ट प्लॉट प्रकरणे तात्काळ निकाली काढावीत. शेतकऱ्यांच्या सर्व पिकांना हमीभाव द्यावा. दोन हेक्टरपर्यंतच्या भात पिकासाठी आदिवासी विकास विभाग देत असलेल्या ४० हजार रुपयांच्या बोनसप्रमाणे वनपट्टाधारकांनाही बोनस द्यावा. पेसा क्षेत्रातील विविध खात्यांतील नोकरभरती तात्काळ पूर्ण करावी. शासकीय आश्रमशाळा, वसतिगृह व जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षक व कर्मचारी भरती करून ग्रामीण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान थांबवावे. शेतकऱ्यांना २४ तास वीजपुरवठा करण्यात यावा.

# चिकू वरील किटक नष्ट करण्यासाठी उपाययोजना



सध्या अनेकांचा कल हा फळबाग लागवडीकडे वळला आहे. त्यामुळे अनेकजण फळबाग लागवड करत आहेत. यामध्ये चिकूची देखील लागवड शेतकरी करत आहेत. चिकू हे देशातील लोकप्रिय फळ आहे. मात्र, त्याची किंमत जास्त असल्याने ती अजूनही अनेकांच्या आवाक्याबाहेर आहे. चिकूची लागवड करून शेतकरी चांगला नफा मिळवू शकतात. भारतात याची लागवड प्रामुख्याने कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये केली जाते. मात्र चिकूमध्ये अनेक हानिकारक कीटक आणि रोग आढळून आल्याची माहिती मिळत आहे. ज्यावर योग्य वेळी नियंत्रण न मिळाल्यास पिकाचे मोठे नुकसान होते. त्यामुळे यावर योग्य वेळी नियंत्रण मिळवणे खूप गरजेचे आहे.चिकूमधील कीटक आणि प्रतिबंध :१) पानांचे जाळे -

चिकूच्या झाडावर पानांच्या जाळ्याने हल्ला केल्यावर पानांवर गडद तपकिरी ठिपके दिसतात. त्यामुळे पाने सुकतात आणि झाडाच्या फांद्याही हळूहळू सुकतात. त्यामुळे बागायतदारांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे याचे वेळीच निरीक्षण करून त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. यावर नियंत्र करण्यासाठी नवीन कोंब तयार होण्याच्या वेळी किंवा फळे काढणीच्या वेळी कार्बारील ६०० ग्रॅम किंवा क्लोरपायरीफॉस २०० मि.ली. किंवा क्विनालफॉस ३०० मि.ली. १५० लिटर पाण्यात मिसळून २० दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. असे केल्यास यावर नियंत्रण मिळवता येईल.

२) अंकुर सुरवंट - अंकुर सुरवंट हा कीटक वनस्पतींसाठी अतिशय धोकादायक आहे. वास्तविक, सुरवंट वनस्पतींच्या कळ्या खाऊन नष्ट करतात. यामुळे तुमच्या उत्पन्नात मोठी घट होण्याची शक्यता असते. यावर नियंत्रण करण्यासाठी क्विनालफॉस ३०० मि.ली किंवा फेम २० १५० लिटर पाण्यात मिसळून प्रति एकर फवारणी करावी. ही फवारणी केल्यास रोगावर नियंत्रण ठेवता येईल.३) केसाळ सुरवंट

चिकू पिकामध्ये हे कीटक कोवळ्या कोंबांचा आणि वनस्पतीला अन्न बनवून त्यांचा नाश करतात. उत्पादकतेवर मोठा परिणाम होतो. यावर नियंत्रण करण्यासाठी क्विनालफॉस ३०० मि.ली १५० लिटर पाण्यात मिसळून प्रति एकर फवारणी करावी. वरील तीन कीटकांचा प्रादुर्भाव चिकूवर प्रामुख्याने आढळून येतो. त्यामुळे तुम्हाला चिकूची योग्य ती काळजी गरजेचे आहे.

# उन्हाळी तीळ लागवडीचे तंत्र

तीळ लागवड प्रामुख्याने खरीप, अर्ध रब्बी आणि उन्हाळी अशा तिन्ही हंगामांत केली जाते. तीळ लागवडीनंतर हवामानात अचानक बदल झाल्यास तिळाची प्रत खालावते. याउलट उन्हाळी हंगामातील तीळ लागवडीमध्ये अधिक उत्पादन मिळून प्रतही चांगली मिळते. पांढऱ्या शुभ्र रंग असलेल्या तिळाला बाजारभावही चांगला मिळतो. त्यामुळे शेतकऱ्यांचा उन्हाळी तीळ लागवडीकडे कल वाढलेला दिसत आहे. उन्हाळी हंगामातील तीळ लागवड अधिक फायदेशीर ठरते.

लागवडीची वेळ आणि कालावधी : उन्हाळी तीळ लागवडीसाठी १५ फेब्रुवारीपर्यंतचा काळ योग्य असतो. उगवणीसाठी किमान १५ अंश, कायिक वाढीसाठी २१ ते २६ अंश आणि फुलधारणेसाठी २६ ते ३२ अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते. तापमान ४० अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास फुलगळ होते. तसेच फुलधारणेच्या काळात जास्त पाऊस झाला तरीदेखील फुलगळ होते.

जमीन : मध्यम ते भारी, पाण्याची निचरा होणारी जमीन लागवडीस निवडावी. वालुकामय पोयट्याच्या जमिनीत पुरेसा ओलावा असल्यास पीक चांगले येते. पूर्वमशागत खोल नांगरट करून कुळवाच्या साह्याने जमीन भुसभुशीत करावी. किंवा रोटाव्हेटरच्या मदतीने जमीन तयार करावी. पेरणीपूर्वी जमिनीवर लाकडी फळी फिरवून जमीन दाबून सपाट करावी. म्हणजे उगवण चांगली होण्यास मदत होते.

तिळाचे सुधारित वाण व त्याचे गुणधर्म

जे.एल.टी ४०८-२ (फुले पुर्णा) : ही जात ८४ ते ९७ दिवसात पक्व होते. मूळ व खोड कुजव्या रोगास साधारण प्रतिकारक आहे. तेलाचे प्रमाण ४९ टक्के असून



उत्पादन ७ ते ८ क्विंटल देते. ए.के.टी.-१०१ : ९० ते ९५ दिवसात पक्व होते. पर्णगुच्छ, मूळ व खोड कुजका रोगास सर्वसाधारण प्रतिकारक आहे. तेलाचे प्रमाण ४८ ते ४९ टक्के असून ७.५ ते ८ क्विंटल उत्पादन देते. बीजप्रक्रिया : प्रतिकिलो बियाण्यांस, थायरम ३ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम २.५ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम याप्रमाणे चोळावे. त्यानंतर अ‍ॅझेटोबॅक्टर अधिक पीएसबी २५ ग्रॅम चोळावे. पेरणी : शक्यतो बैलचलित पाभरीने ३० बाय १५ सेंमी किंवा ४५ बाय १० सेंमी अंतरावर पेरणी करावी. पेरणीवेळी बियाणे २.५ सेंमीपेक्षा जास्त खोलीवर पडणार नाही, याची काळजी घ्यावी. बियाणे जास्त खोलीवर पडल्यास उगवणीवर परिणाम होतो. पेरणीसाठी हेक्टरी २.५ ते ३ किलो बियाणे पुरेसे आहे. विरळणी : पेरणीनंतर ८ ते १० दिवसांनी पहिली, तर १५ ते २० दिवसांनी दुसरी विरळणी करावी. हेक्टरी रोपांची संख्या २.२२ लाख इतकी ठेवल्यास फायदेशीर ठरते. खत व्यवस्थापन : शेवटच्या कुळवणी अगोदर चांगले कुजलेले शेणखत हेक्टरी ५ टन किंवा एरंडी पेंड १ टन याप्रमाणे जमिनीत मिसळावे. तीळ पिकास हेक्टरी ५० किलो नत्राची मात्रा द्यावी. पहिली अर्धी मात्रा २५ किलो नत्र पेरणीवेळी आणि उर्वरित मात्रा पेरणीनंतर २१ दिवसांनी द्यावी. नत्राची दुसरी मात्रा दिल्यानंतर पिकांस लगेच पाणी द्यावे. अधिक उत्पादनासाठी पीक फुलोऱ्यात आणि बोंडे वाढीच्या अवस्थेत असताना २ टक्के युरियाची फवारणी करावी.

आंतरमशागत : सुरुवातीच्या ३५ ते ४० दिवसांच्या कालावधीत तण नियंत्रण करणे गरजेचे आहे. त्यासाठी पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी पहिली कोळपणी आणि निंदणी करावी. तर ३० ते ३५ दिवसांनी दुसरी कोळपणी आणि गरजेनुसार निंदणी करून पीक तणविरहित ठेवावे. पाणी व्यवस्थापन : उन्हाळी तीळ पिकास जमिनीच्या मगदुराप्रमाणे १२ ते १५ दिवसांच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. फुले येण्याच्या आणि बोंडे धरण्याच्या काळात पाण्याचा ताण पडू देऊ नये. पीक संरक्षण : पाने गुंडाळणारी अळी, पाने खाणारी अळी व गादमाशी, रसशोषक किडी, तुडतुडे, कोळी व पांढरी माशी किडीच्या बंदोबस्तासाठी, (फवारणी प्रतिलिटर पाण्यातून) ५ टक्के निंबोळी अर्क किंवा क्विनॉलफॉस (२५ ईसी) २ मिलि याप्रमाणे १५ दिवसांच्या अंतराने दोन वेळा फवारणी घ्यावी. उन्हाळी तीळ पिकात पर्णगुच्छ, मर, व खोड व मूळ कुजव्या रोगाच्या नियंत्रणासाठी पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी, रोगग्रस्त झाडे अथवा भाग गोळा करून नष्ट करावा.

# उसामध्ये घेता येणारी आंतरपिके

राज्यतल्या अनेक भागात उसाचे पीक घेतले जाते. ऊस पिकामध्ये आंतरपीके घेतल्यास ते फायदेशीर ठरते. वेगवेगळ्या उसात कोणती आंतरपीके घेतली जाऊ शकतात याची माहिती घेतल्यास त्याची लागवड करणे सोपे जाते. ऊस लागवड केल्यानंतर त्याच्या पूर्ण उगवण होण्यासाठी सहा ते सात आठवड्यांचा कालावधी लागतो. सुरुवातीच्या काळामध्ये त्याची वाढ हळूहळू होते, त्यामुळे अशावेळी उसाच्या दोन सऱ्यांमध्ये मोकळ्या जागेत आंतरपीक घेतल्याने उसातील तणाचे प्रमाण कमी होते.

सुरू ऊस+ कांदा : सुरू ऊस सहा ते आठ आठवड्यांचे झाल्यानंतर म्हणजेच त्याचे कोंब जमिनीवर उगवून आल्यानंतर कांदा या पिकाच्या रोपांची वरंब्यावर दोन्ही बाजूला लागण करावी. या आंतरपीक पद्धतीमध्ये कांद्याला उसाबरोबरच पाणी आणि खते मिळतात. त्यामुळे कांद्याला वेगळे पाणी आणि खत देण्याची आवश्यकता नसते. कांदा पिकाची मुळे जमिनीत खोलवर जात नाही. ते फक्त पाच ते दहा सेंटिमीटर एवढेच खोलीवर जातात. त्यामुळे तेवढ्यात जमिनीतून अन्नद्रव्ये शोषून घेतात. त्यामुळे कांदा या आंतरपिकाचा उसावर कुठल्याही प्रकारचा विपरीत परिणाम होत नाही. सुरुवातीच्या काळात उसाची वाढ खूप हळू गतीने होत असते तर त्याच काळात कांद्याची वाढ जलद गतीने होते. त्यामुळे तीन ते चार महिन्यात कांदा काढणीस तयार होतो. आंतरपीक म्हणून लागवड केलेल्या कांद्याची उत्पादकता सरासरी ही प्रति हेक्टरी दीडशे ते दोनशे क्विंटल एवढे मिळते.

सुरू ऊस + भुईमूग : या आंतरपीक पद्धतीत जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी तसेच अतिरिक्त उत्पन्न व नफा मिळवण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे. उसाची उगवण झाल्यानंतर कोंब जमिनीवर आल्यावर भुईमूग या पिकाचे लागवड टोकण पद्धतीने वरंब्याच्या दोन्ही बाजूला करावी. भुईमूग पिकाला वेगळी अन्नद्रव्ये तसेच पाणी देण्याची आवश्यकता भासत नाही. ऊस पिकाला देण्यात येणारे खाते आणि पाणी भुईमूग पिकाला हि उपलब्ध होतात. भुईमूग पिके नत्र स्थिरीकरण करणारे पीक असल्यामुळे भुईमुगाच्या घाटीत रायझोबियम नावाचे जिवाणू हवेतील नत्राचे जमिनीत स्थिरीकरण सहजीवी पद्धतीने करतात. हे स्थिर झालेले नत्र नंतर ऊस पिकाला उपलब्ध होऊन त्याचा मोठा फायदा उसाला होतो.

सुरू ऊस+ मेथी किंवा कोथिंबीर : या आंतरपीक पद्धती शक्यतो शहराच्या जवळपास असलेल्या ऊस क्षेत्रामध्ये घेतले जाते. उन्हाळ्यामध्ये मेथी आणि कोथिंबीर या पालेभाज्यांना बाजारात खूप मागणी असते. त्यामुळे रोख पैसे मिळवण्यासाठी शेतकरी उसात मेथी किंवा कोथिंबीर या भाज्यांची लागवड करू शकतात. उसामध्ये या भाज्यांची लागवड करताना उसाची उगवण झाल्यानंतर दोन्ही वरंब्याच्या बाजुने मेथी किंवा कोथिंबीर ची लागवड करावी. या आंतरपीक पद्धतीमुळे शेतकऱ्यांना कमी वेळात ऊसावर कुठलाही परिणाम न होता नगदी पैसा मिळतो.



# दिन विशेष

## जागतिक दिवस: कुष्ठरोग निवारण दिन

### महत्वाच्या घटना

१६४९ : इंग्लंडचा राजा पहिला चार्ल्स याचा शिरच्छेद करण्यात आला.
१९३३ : अ‍ॅडॉल्फ हिटलरचा जर्मनीचा राष्ट्राध्यक्ष (चॅन्सेलर) म्हणून शपथविधी झाला.
१९४८ : नथुराम गोडसे याने मोहनदास करमचंद ऊर्फ 'महात्मा' गांधी यांचा सायंकाळी ५ वाजून १७ मिनिटांनी प्रार्थना करीत असताना गोळ्या घालून खून केला.
१९७१ : आजच्या दिवशी फोकर फ्रेंडशिप विमान चे अपहरण झाले होते.
१९७२ : आजच्या दिवशी कॉमनवेल्थ मधून पाकिस्तान बाहेर निघाले.
१९९४ : पीटर लेंको बुद्धिबळातील सर्वात लहान वयाचा ग्रँडमास्टर झाला.
१९९७ : महात्मा गांधीच्या अस्थींचे त्यांचे पणतू तुषार अरूण गांधी यांनी अलाहाबाद येथील संगमात विसर्जन केले. ४७ वर्षे या अस्थी कटकमधील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या लॉकरमध्ये होत्या.
१९९९ : पण्डित रविशंकर यांना 'भारतरत्न'
२००४ : मंगळावर पाठविलेल्या अपॉर्चुनिटी अंतरीक्ष यानाने मंगळावर आयरन ऑक्साइड (गंज) असल्याचे शोधल्या गेले.
२००८ : चेन्नई च्या विशेष न्यायालयाने स्टॅम्प घोटाळ्यातील मुख्य आरोपी अब्दुल करीम तेलगी ला न्यायालयाने १० वर्षाची शिक्षा सुनावली.
२००९ : ऑस्ट्रेलिया च्या मिक्स ओपन मध्ये सानिया मिर्झा आणि महेश भूपती यांची जोडी अंतिम फेरीत पोहचले.
२००९ : कोका कोला क्लासिक चे नाव बदलवून कोका कोला करण्यात आले.
२०१६ : दक्षिण कोरिया ने त्याचे पहिले रॉकेट रॉकेट नारो-१ चे यशस्वी प्रक्षेपण केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८२ : फ्रँकलिन डी. रुझव्हेल्ट अमेरिकेचे ३२ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १२ एप्रिल १९४५)
१८८९ : हिन्दी भाषेतील प्रसिद्ध कवी जयशंकर प्रसाद यांचा जन्म.
१९१० : सी. सुब्रम्हण्यम गांधीवादी नेते, केन्द्रीय मंत्री व महाराष्ट्राचे राज्यपाल (मृत्यू: ७ नोव्हेंबर २०००)
१९११ : पं. गजाननबुवा जोशी शास्त्रीय गायक (मृत्यू: २८ जून १९८७)
१९१३ : प्रसिद्ध चित्रकार अमृता शेरगिल यांचा जन्म.
१९१७ : वामन दत्तात्रय पटवर्धन स्फोटके व शस्त्रास्त्र तज्ञ (मृत्यू: २७ जुलै २००७)
१९२७ : ओलोफ पाल्मे स्वीडनचे २६ वे पंतप्रधान (मृत्यू: २८ फेब्रुवारी १९८६)
१९२९ : रमेश देव हिंदी, मराठी चित्रपटांतील व रंगभूमीवरील अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक
१९३७ : भारतीय न्यायाधीश के.टे. थॉमस यांचा जन्म.
१९४९ : डॉ. सतीश आळेकर नाटककार, दिग्दर्शक आणि निर्माते, 'थिएटर अ‍ॅकॅडमी'चे एक संस्? थापक,' नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'चे संचालक, साहित्य अकादमी पारितोषिक विजेते
१९५१ : भारताचे केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांचा जन्म.
१९७५ : भारतीय कलाकार अनुप सोनी यांचा जन्म.
१९८० : छोट्या पडद्यांवरील कलाकार गुरदीप कोहली यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५२८ : राजपूत राजवंशाचे राजा राणा संग्राम सिंह यांचा जन्म.
१९४८ : ऑर्व्हिल राईट आपला भाऊ विल्बर राईट याच्यासह इंजिनाच्या विमानाचा शोध लावणारे अमेरिकन अभियंते (जन्म: १९ ऑगस्ट १८७१)
१९४८ : महात्मा गांधी (जन्म: २ आक्टोबर १८६९)
१९५१ : फर्डिनांड पोर्श ऑस्ट्रियन वाहन अभियंता (जन्म: ३ सप्टेंबर १८७५)
१९६० : प्रसिद्ध लेखक, समाजसेवक, नाथूराम प्रेमी यांचे निधन.
१९६० : गांधीवादी व्यक्तिमत्व जे.सी. कुमारप्पा यांचे निधन.
१९६८ : प्रसिद्ध लेखक, कवी, माखन लाल चतुर्वेदी यांचे निधन.
१९९६ : गोविंदराव पटवर्धन हार्मोनियम व ऑर्गन वादक
२००० : आचार्य जनार्दन हरी चिंचाळकर मानववंशशास्त्रज्ञ व सामाजिक कार्यकत
२००४ : रमेश अणावकर गीतकार

# १५० दिवसांचा कार्यक्षम प्रशासनाचा आदर्श ; जिल्हा राज्यात तृतीय

## जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या नेतृत्वाचे राज्यभर कौतुक

धाराशिव

राज्य शासनाने प्रशासनात अधिक पारदर्शकता, गतिमानता निर्माण व्हावी तसेच नवीन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून शासकीय उपक्रम व सुविधांचा थेट लाभ जनतेपर्यंत पोहोचावा,या उद्देशाने १५० दिवसांचा विशेष कृती कार्यक्रम राबविला.या कार्यक्रमांतर्गत सर्व उपक्रम प्रभावीपणे व गुणवत्तापूर्ण रीतीने अंमलात आणण्यासाठी राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेत धाराशिव जिल्ह्याने राज्यात तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जिल्हाधिकारी श्री.कीर्ती किरण पुजार यांच्या कुशल नेतृत्व व दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनाखाली १५० दिवसांच्या कृती आराखड्यानुसार धाराशिव जिल्ह्यात प्रशासन अधिक सक्षम,तंत्रज्ञानस्नेही व नागरिककेंद्रित करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण प्रणाली विकसित करण्यात आल्या.यामध्ये डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड प्रणाली,तुळजाई चॅटबॉट, कल्पवृक्ष स्मार्ट जीआर प्रणाली तसेच जीवनरेखा प्रणाली या महत्त्वाच्या डिजिटल उपक्रमांचा समावेश आहे.



डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड प्रणालीद्वारे जिल्ह्यातील विविध विभागांच्या शासकीय योजनांचा एकत्रित आढावा घेणे सुलभ झाले आहे.या प्रणालीमुळे योजनांची उद्दिष्टपूर्ती, प्रगतीवर सतत लक्ष ठेवणे व वेळेत पाठपुरावा करणे अधिक कार्यक्षम पद्धतीने शक्य झाले असून प्रशासनाच्या निर्णय प्रक्रियेला गती मिळाली आहे. तुळजाई चॅटबॉट - ही प्रणाली नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली आहे.या माध्यमातून पुरवठा विभाग, संजय गांधी योजना, नैसर्गिक आपत्ती,आपले सरकार सेवा केंद्रावरील सेवा याबाबतची माहिती काही क्षणांत उपलब्ध होते.जिल्हा संकेतस्थळाशी संलग्न असलेल्या या प्रणालीवरून नागरिक घरबसल्या आवश्यक कागदपत्रांची माहिती, योजना पात्रता तसेच शंकांचे तात्काळ निरसन करू शकतात. मोबाईल,लॅपटॉप किंवा संगणकावर सहज वापरता येणाऱ्या या सुविधेमुळे नागरिकांचा वेळ व खर्च वाचून प्रशासन अधिक गतिमान झाले आहे. कल्पवृक्ष स्मार्ट जीआर प्रणाली ही शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली आहे.शासन निर्णय,कायदे, परिपत्रके यांची एकत्रित व अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणाऱ्या या प्रणालीमुळे प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ,अचूक व जलद झाले आहे.जीवनरेखा प्रणाली ही शेत रस्त्यांशी संबंधित एक महत्त्वाची डिजिटल व्यवस्था असून, जिल्ह्यातील सर्व गट नंबर व सर्वे नंबरनिहाय शेत रस्त्यांची नोंद या प्रणालीत करण्यात आली आहे. त्यामुळे शेत रस्त्यांबाबतच्या तक्रारी, नागरिकांचे प्रश्न,तसेच रस्ता उपलब्धतेसाठीचे अर्ज यांचे प्रभावी निराकरण शक्य झाले असून ग्रामीण भागातील विकासाला मोठी चालना मिळत आहे. यासोबतच ई-ऑफिस प्रणालीचा जास्तीत जास्त वापर केल्यामुळे पेपरलेस कार्यालय ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होत असून, शासकीय कामकाजाचा निपटारा जलद व पारदर्शक पद्धतीने होत आहे.या सर्व उपक्रमांचा थेट लाभ जिल्ह्यातील नागरिकांना मिळत असून,सेवा वितरण अधिक सुलभ, जलद व विश्वासार्ह झाले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल राज्यभरातून कौतुक होत असून पालकमंत्री श्री.प्रताप सरनाईक यांनी जिल्हाधिकारी श्री.कीर्ती किरण पुजार यांचा सत्कार करून जिल्हा प्रशासनाच्या कार्याचे विशेष कौतुक केले.भविष्यात धाराशिव जिल्ह्याला राज्यात प्रथम क्रमांकावर नेण्यासाठी प्रयत्न करण्याच्या शुभेच्छाही त्यांनी दिल्या. या प्रसंगी अपर जिल्हाधिकारी श्रीमती ज्योती पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी श्री.विद्याचरण कडवकर,उपजिल्हाधिकारी (निवडणूक) श्री.शिरीष यादव, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीमती स्वाती शेंडे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) श्री. प्रविण धरमकर,उपजिल्हाधिकारी (मध्यम प्रकल्प क्र. २) श्री.संतोष राऊत,उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) श्रीमती अरुणा गायकवाड, उपजिल्हाधिकारी (मांजरा प्रकल्प) श्री.श्रीकांत पाटील,सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भूम श्री.रेवैयाह डोंगरे (भा.प्र.से.), उपविभागीय अधिकारी धाराशिव श्री.ओंकार देशमुख, उमरगा श्री.दत्तू शेवाळे,कळंब श्री. गणेश शिंदे,सर्व तालुका तहसीलदार, महसूल तहसीलदार श्री.प्रकाश व्हटकर,सर्व नायब तहसीलदार, जिल्हा सूचना व विज्ञान केंद्र अधिकारी श्री.अंकीत सिंग,सीएम फेलो श्री.मनोज नाईकवाडी, श्री.रणधिरसिंह भोसले,जीआयओ श्री.विश्वजीत साखरे,जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक श्री.तानाजी हंगरगेकर, सीनियर नेटवर्क इंजिनियर श्री.बंडू गाडे,श्री.अमोल कांबळे तसेच जिल्ह्यातील सर्व सहायक महसूल अधिकारी,महसूल सहायक,मंडळ अधिकारी,ग्राम महसूल अधिकारी ते महसूल सेवक यांनी या यशासाठी सांघिक प्रयत्न केले. या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या योगदानाबद्दल जिल्हाधिकारी श्री. कीर्ती किरण पुजार यांनी विशेष कौतुक केले.तसेच प्रशासनात () सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू करण्यात आल्याचे नमूद करून नागरिकांनी या सर्व डिजिटल सुविधांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा,असे आवाहन त्यांनी केले. १५० दिवसांचा हा उपक्रम धाराशिव जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मैलाचा दगड ठरत असून,भविष्यात जिल्ह्याच्या प्रगतीला नवी दिशा देणारा ठरणार आहे.



## महाराष्ट्र महान नेत्याला मुकला

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याची अत्यंत दुःखद, धक्कादायक आणि वेदनादायी बातमी सकाळी सकाळीच कळली. मन सुन्न झाले. महाराष्ट्र एका महान नेत्याला मुकला आहे. दादा स्पष्टवक्ते, विकासाभिमुख लोकनेते होते, हे महाराष्ट्र आणि देशाला माहित आहे. लोकशाहीवर ठाम विश्वास असलेल्या या महान नेतृत्वाचा दुर्दैवी अंत झाला आहे. चाळीस वर्षे विधानसभा सभागृहाच्या निमित्ताने त्यांच्याशी संपर्क राहिला आहे. अलीकडे दादा आमच्या घरी आले होते. स्वच्छतेच्या दृष्टीने दादा काही टिपणी करतील म्हणून आधीच काळजी घेतली होती. त्यांचा शासन आणि प्रशासनात नैतिक दरारा होता. कडक शिस्तीचे वाटणारे दादा तेवढेच प्रेमळही होते. एका महान नेत्यास महाराष्ट्र मुकला असून राज्याचे मोठे नुकसान झाले आहे. पवार कुटुंब आणि महाराष्ट्रावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, ही प्रार्थना.

भावपूर्ण श्रद्धांजली...

-आ.अर्जुन खोतकर.

---

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अपघाती निधन झाल्याची अत्यंत दुःखद व वेदनादायक घटना समोर आली आहे. या दुर्घटनेत त्यांचा मृत्यू झाल्याने महाराष्ट्राने एक कणखर, शिस्तबद्ध व दूरदृष्टी असलेले नेतृत्व गमावले आहे. कडक प्रशासक म्हणून ओळख असलेले अजितदादा पवार यांनी आपल्या कार्यकाळात राज्याच्या विकासाला गती देत जनहिताच्या अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांद्वारे महाराष्ट्राच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिले.

त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी आहे. या दुःखद प्रसंगी आम्ही त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो, हीच प्रार्थना करतो.

- श्री. भास्कर आबा दानवे
भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष, जालना

# १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स कार्यक्रम; छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालय राज्यात दुसरे

छत्रपती संभाजीनगर

राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांच्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद यांच्याकडून करण्यात आले. या मूल्यमापनात छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाने उत्कृष्ट कामगिरी करत राज्यात दुसरा क्रमांक मिळविला आहे. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयात ई-गव्हर्नन्स उपक्रमांची नियोजनबद्ध अंमलबजावणी करण्यात आली. विभागनिहाय सातत्यपूर्ण आढावा, ई-ऑफिसचा प्रभावी वापर तसेच नागरिक-केंद्रित निर्णय प्रक्रियेवर भर देण्यात आल्याने विभागाला हे यश मिळाले आहे.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जाहीर करण्यात आलेल्या या मूल्यमापनात कार्यालयाची वेबसाईट, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सअॅप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन तसेच तंत्रज्ञानाचा शासकीय कामकाजात झालेला वापर या सात निकषांवर कामगिरी तपासण्यात आली. राज्यात दुसरा क्रमांक मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सर्व विभागप्रमुखांशी संवाद साधून अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

यावेळी अपर विभागीय आयुक्त प्रताप काळे, अपर विभागीय आयुक्त खुशालसिंह परदेशी, अपर आयुक्त रिता मेत्रेवार, उपजिल्हाधिकारी शुभांगी आंधळे, अपर विभागीय आयुक्त मंजुषा मिसकर, सहआयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, सहआयुक्त राजेश काटकर, उप आयुक्त दादासाहेब वानखेडे, उपआयुक्त सुषमा देसाई, सहायक आयुक्त सरीता सुत्रावे, नगर प्रशासन विभागाचे देविदास टेकाळे, सहायक आयुक्त मंजुषा कापसे, महानगर नियोजनकार हर्षल बावीस्कर, जिल्हा विज्ञान व सूचना अधिकारी विद्याधर शेळके, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना विभागीय आयुक्त श्री. पापळकर म्हणाले की, १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमामुळे शासकीय कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान आणि तंत्रज्ञानाधारित झाले आहे. ही कामगिरी विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित असून, भविष्यातही प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचा वापर सुरू ठेवला जाईल.

१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयांच्या कामगिरीचेही मूल्यमापन करण्यात आले. यामध्ये राज्यातील सर्वोत्कृष्ट पाच जिल्हाधिकारी कार्यालयांत धाराशिव व लातूर जिल्हाधिकारी कार्यालयांचा समावेश झाला आहे. धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार आणि लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या कामगिरीची राज्य पातळीवर दखल घेण्यात आली आहे. प्रशासकीय सुधारणा अंतर्गत राबविण्यात आलेल्या १५० दिवसांच्या 'सेवाकर्मी प्लस' कार्यक्रमात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक प्रगतीचे मूल्यांकन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत नगरपालिका गटात राज्यातील निवड झालेल्या १७ पैकी ९ नगरपालिका छत्रपती संभाजीनगर विभागातील आहेत. यामध्ये लातूर जिल्ह्यातील उदगीर, अहमदपूर, निलंगा व औसा, धाराशिव जिल्ह्यातील कळंब, तुळजापूर, लोहारा, नळदुर्ग तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड नगरपरिषदेचा समावेश आहे.

# स्व. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना सर्वपक्षीय शोकसभेत भावपूर्ण श्रद्धांजली

जालना (प्रतिनिधी)

महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली असून, या दुःखद घटनेच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांच्या वतीने बुधवार, २९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी जालना शहरात सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेला भाजपा नेते माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटिल दानवे, आमदार बबनराव लोणीकर, आमदार अर्जुनराव खोतकर, आमदार नारायण कुचे, कैलाश गोरंट्याल, माजी आमदार अरविंदराव चव्हाण, शहर जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे, माजी नगराध्यक्ष जालना भास्करराव आंबेकर, भाऊसाहेब घुगे, यांच्यासह विविध पक्षांचे ज्येष्ठ नेते, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच हजारो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी दोन मिनिटांचे मौन पाळून स्व. अजितदादा पवार यांच्या आत्म्यास शांती लाभो, तसेच त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याचे बळ मिळो, अशी प्रार्थना करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतीस अभिवादन करत त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन महाराष्ट्राच्या विकासासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

**महाराष्ट्राच्या राजकारणातील कणखर नेतृत्व हरपले'' – भाजपा नेते रावसाहेब दानवे**

भाजपा नेते रावसाहेब पाटील दानवे यांनी आपल्या भाषणात स्व. अजितदादा पवार यांच्या निधनाची बातमी अत्यंत धक्कादायक असल्याचे सांगितले. अजितदादा पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक कणखर, स्पष्टवक्ते आणि निर्णायक नेतृत्व होते. राजकीय मतभेद असले तरी राज्याच्या विकासासाठी त्यांनी घेतलेले निर्णय नेहमीच महत्त्वाचे राहिले असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली असून ही हानी भरून न निघणारी आहे, असे त्यांनी सांगितले.

**अजितदादा पवार यांचे नेतृत्व राज्याला दिशा देणारे होते''– आ.बबनराव लोणीकर**

आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या भाषणात स्व. अजितदादा पवार हे सर्वसामान्य जनतेशी नाळ जोडणारे नेतृत्व होते, असे सांगितले. प्रशासनातील त्यांची पकड, निर्णयक्षमता आणि काम करण्याची धडाडी यामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळे स्थान निर्माण केले. जनतेच्या प्रश्नांसाठी त्यांनी कायम ठाम भूमिका घेतली आणि विकासाभिमुख राजकारणाची दिशा दिली, असे लोणीकर यांनी नमूद केले. त्यांच्या अकाली जाण्याने राज्यासाठी मोठी हानी झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

**अजितदादा केवळ नेता नव्हते, लाखो लोकांचा आधार होते''– आ.अर्जुनराव खोतकर**

यांनी अत्यंत भावनिक शब्दांत स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली. ते केवळ एक नेता नव्हते, तर लाखो लोकांचा आधार होते, असे त्यांनी सांगितले. सामान्य माणसाच्या प्रश्नांशी त्यांची असलेली जवळीक, प्रशासनातील अनुभव आणि नेतृत्वगुण यामुळे ते महाराष्ट्राच्या राजकारणात अढळ स्थान निर्माण करू शकले. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही, असे खोतकर यांनी नमूद केले.

**अजितदादा पवार साहेबांचे मार्गदर्शन कायम प्रेरणादायी राहील''– आ.नारायण कुचे**

आमदार नारायण कुचे यांनी आपल्या भाषणात स्व. अजितदादा पवार यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा दिला. दादांचे मार्गदर्शन, आपुलकी आणि विकासाभिमुख दृष्टिकोन नेहमीच प्रेरणादायी राहिला असल्याचे त्यांनी सांगितले. जनतेच्या हितासाठी त्यांनी केलेले कार्य आणि घेतलेले निर्णय महाराष्ट्राच्या इतिहासात कायम स्मरणात राहतील, असे कुचे यांनी नमूद केले.

# गाय कापून व्हिडिओव्हायरल केल्याप्रकरणी अस्लम कुरेशीला १ वर्षासाठी स्थानबध्द

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्हयातील समाजविघातक कृत्ये करणारे व धोकादायक व्यक्तींचे अॅक्ट १९८१ चे कलम ३(१) अन्वये स्थानबध्द करणे बाबतचा प्रस्ताव सादर करणे बाबत मा. पोलीस अधीक्षक, यांनी सर्व ठाणे प्रभारी अधिकारी यांना सुचना दिलेल्या आहेत. पोलीस ठाणे सदर बाजार हद्दीतील अस्लम महेमुद कुरेशी याने गणेश उत्सव काळात गाय कापुन त्याचे व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल करुन दोन धर्मात तेढ निर्माण केली होती. त्यामुळे गणेश उत्सव काळात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. तसेच त्याचे विरुध्द सामाजीक तेढ निर्माण करणारे गुन्हयांची नोंद झालेली होती. त्यावरुन पोलीस निरीक्षक सदर बाजार यांनी अस्लम महेमुद कुरेशी रा. मंगळबाजार जालना याचा अंतर्गत स्थानबध्दतेचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक कार्यालय येथे सादर केला होता.

सदर प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी मा. जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात सादर करण्यात आला होता. मा. जिल्हाधिकारी यांनी दिनांक २७/०१/२०२६ रोजी नमुद इसमास ०१ वर्ष कालावधीसाठी मध्यवर्ती कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबध्द करण्यात येत असल्याबाबतचे आदेश निर्गमीत केले आहे. सदर इसमाचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेण्यात आले असुन त्यास कायदेशीर प्रक्रीया पूर्ण करुन मध्यवर्ती कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबध्द करण्यात येणार आहे.सदरची कारवाई श्री. अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक, श्री. आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक, अनंत कुलकर्णी, उप विभागीय पोलीस अधिकारी जालना यांचे मार्गदर्शनाखाली पोलिसांनी कारवाई केली.

क्र.२०२६ / संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार अंबाजोगाई
दि.२९.०१.२०२६

**जाहिरनामा**

**जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, अर्जदार तोंडे गणेश अनुरथ रा.सोनपेठवाडी ता. जि.बीड यांची मुलगी नामे तोंडे श्रेयांका गणेश यांचा जन्म दिनांक ०३.०७.२०२३ रोजी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड येथे जन्म झाला आहे अर्जदारानी जन्म कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदार यांचे कायदेशीर जन्म दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदर अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे मुलाचे जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

स्वाक्षरित

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार अंबाजोगाई**

# तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट शाळेमध्ये स्नेहसंमेलन व पालक मेळावा

बीड

नवगण शिक्षण संस्था संचलित तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट तालुका बीड या शाळेमध्ये आज सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला त्याचबरोबर पालक मेळाव्याचे देखील आयोजन करण्यात आले होते सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये आठवी नववी दहावी तिन्ही वर्गातल्या मुला मुलींनी लेझीमाच्या तालावरती विविध गाण्याने प्रेक्षकांचे मनोरंजन केले सर्व विद्यार्थ्यांना फेटे बांधण्यात आले होते त्याचबरोबर सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये लावणी ग्रुप डान्स सोलो डान्स कोळी डान्स इत्यादी विविध महाराष्ट्राच्या जी परंपरा आहे ती परंपरा प्रत्येक विभागाच्या गाण्याचे सादरीकरण करून विद्यार्थ्यांनी व प्रेक्षकांनी मनमुराद आनंद लुटला प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मुख्याध्यापक श्याम डाके सर व त्यांचे सर्व सहकारी त्याचबरोबर तांदूळ वाडी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक क्षीरसागर सर व त्यांचे सर्व सहकारी सर्वांनी मोलाचे सहकार्य केले अशी माहिती श्याम डाके यांनी दिली.



या कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिकांमध्ये सरपंच बळीराम शेठ शिरसाट उपसरपंच महादेव अण्णा खोसे ग्राम पंचायत सदस्य शहादेवराव खोसे दुसरे ग्रामपंचायत सदस्य अनिल खोसे माजी मुख्याध्यापक एस आर खोसेसर उर्फ आबा आदरणीय पांचाळ तात्या पोलीस पाटील दिगंबर रावजी खोसे माजी उपसरपंच पिंटू शेठ उर्फ श्रीकृष्ण भागडे दिनकर रावजी शिरसाट चेअरमन संजय जी खोसे बापूराव शिरसाट रामहरी खोसे साहेब त्याचबरोबर बंडू खोसे जि प प्रा शाळा अध्यक्ष यांची उपस्थिती होती त्याचबरोबर काळे फौजी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन मिलिंद जगताप राजेंद्रजी टेकडे सुंदर तात्या खोसे त्याचबरोबर केंद्रीय मुख्याध्यापक शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन आदरणीय विजय रावजी खोसे सर संदीप जी भागडे हे ही आवर्जून उपस्थित होते अनेक मान्यवरांनी सढळ हाताने या विद्यार्थ्यांच्या अभिनयाला दात देऊन बक्षीस दिली विद्यालयाने सुद्धा विविध कार्यक्रमांमध्ये चित्रकला स्पर्धा स्टुडन्ट ऑफ द इयर वर्षभरातल्या अनेक स्पर्धा चे बक्षीस वितरण विद्यालयाकडून करण्यात आले याप्रसंगी अंधापुरीचे सरपंच श्री पप्पू जी जगताप व त्यांच्या धर्मपत्नी मनिषा जगताप सरपंच उपस्थित होत्या या कार्यक्रम प्रसंगी महिलांची संख्या लक्षणीय होती व पंचक्रोशीतील अंधापुरी घाट तांदळवाडी घाट व पंचक्रोशीतील सर्व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित असल्यामुळे कार्यक्रमाची शोभा वाढली डॉल्बीच्या तालावर व लेझीमच्या तालावर बहारदार कार्यक्रम या ठिकाणी पार पाडण्यात आला सुशोभीकरण मैदानाचे व कार्यक्रमाचे स्टेज देखणीय होते प्रस्ताविक करताना मुख्याध्यापक डाके सरांनी सांगितले की विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी अशा कार्यक्रमांची आवश्यकता आहे पालकांनी सर्वांनी सहकार्य करावे शाळा प्रगतीच्या दिशेने आपली वाटचाल करत आहे यामध्ये सुशिक्षित पालकांचा सहभाग नेहमी असावा असे मत त्यांनी व्यक्त केले शेवटी पालक प्रतिनिधी म्हणून महादेव अण्णा खोसे उपसरपंच यांनी आपल्या मनोगतामध्ये जिल्हा परिषद शाळा व तांदळेश्वर विद्यालय दोन्हींचे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे खूप खूप कौतुक केले तुम्ही काम करत राहा आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू अशी ग्वाही दिली व सर्व शिक्षकांचा त्यांनी व गावकऱ्यांनी सत्कार केला कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली व सर्व मान्यवरांच्या आभार डाके सर यांनी मानले डाके सर्? त्यांच्या टीमने सर्व नागरिकांना नाश्ता व चहापाण्याची सोय केली होती या कार्यक्रम प्रसंगी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सर्वांनीच मोलाचे सहकार्य केले व कार्यक्रम संपविण्यात आला.

# समाजात घडणाऱ्या घटनांबद्दल पत्रकारांनी आवाज उठवला पाहिजे-संजय मालानी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई-समाज व्यवस्थेमध्ये घडणाऱ्या नकारात्मक किंवा सकारात्मक घटनांबद्दल पत्रकारांनी आवाज उठवला पाहिजे असे मत पत्रकार संजय मालाणी यांनी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीयाच्या वतीने आयोजित केलेल्या सत्कार समारंभात पुरस्काराला उत्तर देताना व्यक्त केले.

पत्रकार कक्षात पत्रकारिता,सामाजिक व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.यावेळी बीड जिल्ह्यातून सर्वोत्कृष्ट प्रिंट मिडीयाचा पुरस्कार दै.प्रजापत्र चे ज्येष्ठ पत्रकार संजय मालाणी यांना तर डीजीटल मिडीयाचा पुरस्कार साम टी.व्हीचे पत्रकार योगेश काशिद यांना देण्यात आले.यावेळी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे,माजी आमदार सौ.संगिताताई ठोंबरे,राजेसाहेब देशमुख, डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे, विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, पो.नि.शरद जोगदंड, डॉ.राजेश इंगोले,ॲड अजित लोमटे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना पत्रकार संजय मालाणी यांनी म्हटले की,पत्रकारांनी छापलेली बातमी प्रत्येकवेळी नकारात्मक नसते.त्या बातमीची सत्यता पडताळून समाज व्यवस्थेने चांगले कार्य केले पाहिजे.प्रशासकीय व राजकीय क्षेत्रातील सर्वच घडामोडींवर लिखाण केले गेले पाहिजे.पत्रकारांनी निर्भीड पणे लिखाण करून समाजाचे दर्पण म्हणून कार्य करीत राहावे,असे म्हटले. तर अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी बोलताना म्हटले की अंबाजोगाई चे पत्रकार जे सत्य आहे तेच छापतात.येथील पत्रकार संयमी आणि सकारात्मक लिखाण करतात,असे मतही त्यांनी व्यक्त केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेसाहेब देशमुख यांनी यावेळी पत्रकारांना शुभेच्छा देत म्हटले की,जे पुरस्कार दिले आहेत.ते योग्य पत्रकारांना दिले आहेत.पत्रकार समाजाचे दर्पण समजले जातात,बीड जिल्ह्यातील पत्रकार खरोखरच समाज हित समोर ठेवून लिखाण करतात.अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख हे बीड जिल्ह्यातीलच पत्रकार आहे.येथूनच महाराष्ट्र नव्हे तर देशात सुत्रे हालत आहेत, एवढी ताकद बीड जिल्ह्यातील पत्रकारांमध्ये आहे.पत्रकारिता,सामाजिक व इतर क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल जो पुरस्कार देवून गौरवण्यात आले अशा सर्व मान्यवरांचे त्यांनी अभिनंदन केले. तर माजी आमदार सौ.संगिताताई ठोंबरे यांनी बोलताना म्हटले की,अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषद संघातील पत्रकार हे खरोखरच समाजातील त्या घटकांवर प्रकाश टाकतात जेथे खूप आवश्यकता असते,आजचे सत्कार मुर्ती हे त्याचेच द्योतक आहे.विविध क्षेत्रातील लोकांना एकत्र करीत आज जे व्यासपीठ उपलब्ध करून दिले.त्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले. याचवेळी अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय जोगदंड यांनी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीयाच्या सर्व पत्रकार सदस्यांच्या कार्याचे कौतुक केले.शांतप्रिय व सांस्कृतिक वारसा असलेल्या अंबाजोगाई शहरात नागरिकांबरोबरच पत्रकार सुध्दा खूप चांगले आहेत.विविध क्षेत्रातील लोकांचा सन्मान करणे ही अंबाजोगाईची संस्कृती आहे.अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून लोकं एकत्र येतात.आज एकमेकांचा संवाद तुटत चालला आहे,अशी खंत ही त्यांनी व्यक्त केली. येथील पत्रकार जागृत आहेत.बातमी सकारात्मक छापतात.असे म्हणत त्यांनी सर्व पुरस्कारार्थी व सत्कार मुर्तींना शुभेच्छा देत पुढील वर्षांत मी येथे कार्यरत राहिलो तर नविन पत्रकार भवनात जरूर येईल असे आश्वासनही त्यांनी दिले. यावेळी डॉ.राजेश इंगोले यांनी मला अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदे च्या राज्य कार्यकारिणीत घेतल्यामुळे महाराष्ट्रात एकाच वेळी सर्वच तालुक्यात पत्रकारांचे आरोग्य ठणठणीत राहावे, या करिता भव्य आरोग्य शिबीर घेण्यात येणार असल्याचे जाहीर केले.यावेळी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गजानन मुडेगावकर ,बालाजी खैरमोडे, अभिजीत लोमटे, सतिश मोरे, संजय जोगदंड, सालेम पठाण, मारोती जोगदंड, अभय जोशी, सूर्यकांत उदारे , ताहेर पटेल, अशोक कोळी,सिद्दिकी आरेफ, स.का पाटेकर, अनिरुद्ध पांचाळ, विश्वनाथ कांबळे,बालासाहेब ढगे,गोविंद सुर्यवंशी,शेख अहमद,दत्ता खोगरे,योगेश डाके,सचिन मोरे,अमोल माने,वैभव चौसाळकर,अश्विनी लोमटे, बालाजी देशमुख,जहांगीर इनामदार,अहमद पठाण, आदींनी परिश्रम घेतले.



**मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा सत्कार**

# अजितदादांच्या निधनाने राज्य शोकसागरात; बीड न.प.मध्ये मात्र २२ कोटींच्या टेंडरची घाई

**भाजप युवा नेते ॲड.नागेश तांबारे यांचा गंभीर आरोप**

बीड । प्रतिनिधी



राज्यात सर्वत्र अजितदादांच्या निधनामुळे शोककळा पसरलेली असताना बीड नगरपरिषदेत मात्र सत्ताधाऱ्यांचे वेगळेच गणित सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. बारामतीमध्ये अंत्यविधी सुरु असतानाच बीडमध्ये उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांच्यासह अधिकाऱ्यांनी २२ कोटी रुपयांच्या टेंडरसाठी बैठक घेतली असल्याचा गंभीर आरोप भाजपचे युवा नेते ॲड.नागेश तांबारे यांनी केला आहे.

त्यांनी पत्रकात पुढे म्हटले की, बीड नगरपरिषदेत बैठक पार पडली. या बैठकीला नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, मुख्याधिकारी शैलेश फडसे, किरण देशमुख यांच्यासह इतर अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. मात्र, या बैठकीचा विषय आणि वेळ ही असंवेदनशीलता दर्शविणारी आहे. एकीकडे संपूर्ण राज्य अजितदादा पवार यांच्या निधनामुळे शोकसागरात बुडालेले असताना, बीड नगरपरिषदेत मात्र कोट्यवधी रुपयांच्या टेंडरची घाई का? ही बैठक इतकी तातडीची होती का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. २२ कोटी रुपयांच्या कामांसाठी आधीच नियोजनबद्ध हालचाली सुरू आहेत. सामान्य नागरिकांच्या भावनांना काहीच किंमत दिली जात नाही. ही असंवेदनशीलता आणि सत्तेची हाव दाखवणारी बाब आहे. 'शोककाळातही टेंडर राजकारण थांबत नाही' हे निंदनीय आणि निषेधार्ह असल्याची टीका ॲड. तांबारे यांनी केली आहे. तसेच, ज्यांनी खुर्चीवर बसविले त्यांचाच विसर इतक्या लवकर पडावा, हे दुर्दैवी असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# चार वाजता सुटणारी सौताड्याची शाळा ३ वाजताच सुटली; पालकांची गट शिक्षणाधिकाऱ्यांकडे तक्रार

सौताडा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सौताडा येथे जिल्हा परिषदेचे माध्यमिक शाळा आहे. ही शाळा गुरुवारी तीन वाजताच सुटली. दररोज शाळा चार वाजता सुटते आज तीन वाजताच कशी काय सुटली.याची पालकांनी विचारणा केली असता शिंदे नावाच्या शिक्षकाने पालकांना उद्धटपणे 'आम्ही तीनला सोडू नाही तर दोन ला सोडू तुम्हाला काय करायचे आहे' असे उध्दट उत्तर दिले. यावरून पालकांनी या प्रकाराची गटशिक्षणाधिकारी गव्हाणे यांच्याकडे तक्रार केली असून ते या शाळेच्या पंचनामा करण्यासाठी आज सौताडा येथे येत आहेत.




जिल्हा परिषदेच्या मोजक्या माध्यमिक शाळा उरल्या आहेत. यातही विद्यार्थ्यांची कमतरता असते. मात्र सौताड्यातील शाळेमध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थी आहेत. ही शाळा व्यवस्थित चालावी यासाठी पालकही सजग असतात. या ठिकाणचे प्रमुख कार्यकर्ते शाळेकडे जाणीवपूर्वक लक्ष देतात. काही पालकही शाळा चांगली चालावी यासाठी सजग आहेत. एका पालकाने शाळा तीन वाजता कशी काय सुटली? याची चौकशी केली असता त्याला उध्दट पणे उत्तर देण्यात आले.

**शिंदेची मुजोरी**

दररोज चार वाजता सुटणारी शाळा तीन वाजता कशी काय सुटली? याची चौकशी करण्यासाठी पालकांनी मुख्याध्यापकांना दूरध्वनी केला. या दूरध्वनीवरून मुख्याध्यापक बेंद्रे यांनी चाचणी परीक्षा असल्याने शाळा तीन वाजता सोडल्याचे सांगितले. मात्र मध्येच शिंदे नावाच्या शिक्षकाने उध्दटपणे 'आम्ही शाळा दोन वाजता सोडू ,नाही तर तीन वाजता सोडू तुम्हाला काय करायचे आहे? असा प्रति प्रश्न केला. या उत्तरामुळे पालकांमध्ये संताप व्यक्त केला जात असून या प्रकरणाची सखोल चौकशी करावी अशी मागणी पालकांनी गटशिक्षणाधिकारी गव्हाणे यांच्याकडे केली आहे.

दररोज ही शाळा चार वाजता सुटते. मात्र गुरुवारी शाळा तीन वाजता सुटल्याने आणि विद्यार्थ्याने पालकांना सांगितल्याने पालकांनी याचा विचारणा केली असता मुख्याध्यापकांनी चाचणी परीक्षा असल्याने शाळा लवकर सुटली असे सांगितले. तर याच ठिकाणी कार्यरत असलेल्या शिंदे नावाच्या शिक्षकाने 'आम्ही तीन वाजता सोडू नाहीतर दोन वाजता सोडू तुम्हाला काय करायचे आहे?' असे पालकांना उद्धटपणे उत्तर दिले. या प्रकरणाची तक्रार पालकांनी गटशिक्षणाधिकारी गव्हाणे यांच्याकडे केलेली असून या प्रकरणाच्या चौकशीसाठी गव्हाणे शुक्रवारी या शाळेला भेट देणार आहेत.

# शिवणी येथे बालविवाह व मतदार जनजागृती रॅली

**तुलसी फॅशन डिझाईन कॉलेजच्या रासेयो तर्फे जनजागृती अभियान**

बीड । प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापन व पडीक जमीन विकासासाठी युवा' या संकल्पनेअंतर्गत सात दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन शनिवार दि.१८ रोजी तालुक्यातील शिवणी येथे करण्यात आले आहे. या शिबिराचे औचित्य साधून शिवणी येथे बालविवाह प्रतिबंध आणि मतदार जागृती रॅली मोठ्या उत्साहात काढण्यात आली.




ही रॅली शिवणी ग्रामपंचायत कार्यालयापासून सुरू होऊन गावातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत ज्ञानेश्वर मंदिराच्या पटांगणात सांगता करण्यात आली.

रॅलीदरम्यान ''मुलींना समजू नका भार, जीवनाचा आहे खरा आधार'', ''बालविवाह म्हणजे बालअत्याचार'', ''मुलींना वाचवा, देश वाचवा'', ''प्रत्येकाने मतदान करा, लोकशाही बळकट करा'' अशा घोषवाक्यांच्या माध्यमातून बालविवाहाचे दुष्परिणाम तसेच मतदानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आले. यावेळी उपस्थितांनी बालविवाहमुक्त गाव घडवण्यासह जागरूक व जबाबदार मतदार घडवण्याचा संकल्प केला. रॅलीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ.अश्विनी बेंद्रे, उपप्राचार्या प्रा.सय्यद शहाणा, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.वृषाली लोखंडे, प्रा.श्वेता वंजारे, प्राध्यापकवृंद तसेच रासेयो स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# श्री क्षेत्र मिराबाई आईसाहेब महासंगवी संस्थानात उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**पाटोदा । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र मिराबाई आईसाहेब संस्थान येथे सुरू असलेल्या अखंड हरीनाम सप्ताहादरम्यान महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली त्यांच्या आकस्मिक निधनाच्या वृत्ताने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून, कीर्तन सेवेच्या माध्यमातून त्यांना आदरांजली वाहण्यात आली

कीर्तन सेवेतून शोक व्यक्त



मिराबाई आईसाहेब संस्थान येथे अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहातील कीर्तन सेवेदरम्यान महंत राधाताई महाराज आणि उपस्थित कीर्तनकार महाराजांनी अजित दादांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले दादांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी आणि विशेषत ग्रामीण भागाच्या उत्थानासाठी दिलेले योगदान अतुलनीय असल्याचे गौरवोद्गार यावेळी काढण्यात आले

ग्रामस्थांचा सहभाग

महासांगवी आणि परिसरातील गावकरी मोठ्या संख्येने या सप्ताहात उपस्थित होते. लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देताना ग्रामस्थांचे डोळे पाणावले होते दादांचे जाणे ही महाराष्ट्राची मोठी हानी आहे, अशा भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केल्या. कीर्तनाच्या सांगतेवेळी दोन मिनिटे मौन पाळून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली



**बीड : अजित आशाताई अनंतराव पवार, उपमुख्यमंत्री यांचे दुःखद निधन झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे वतीने आज जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.**

# गटविकास अधिकाऱ्यांच्या लेखी पत्रानंतर उपोषण मागे

शिरूर । प्रतिनिधी

तालुक्यातील उकिर्डा चकला या ग्रामपंचायतने एम.आर.इ जी.एस योजनेअंतर्गत केलेल्या बेकायदेशीर कामाची चौकशी करून दोषीवरती कारवाई करावी या मागणीसाठी मधुकर संदीपपान पानसंबळ यांनी निर्जन व ओसाड डोंगरावरती गेली चार दिवस उपोषण केले होते. अखेर हे उपोषण गटविकास अधिकारी यांच्या लेखीपत्रानंतर पानसंबळ यांनी मागे तूर्तास घेण्यात आले आहे.

शिरूर कासार तालुक्यातील उकिर्डा चकला या ग्रामपंचायत शिवारामध्ये असलेल्या गायरान डोंगरावरती ग्रामपंचायतने एम.आर.इ.जी. एस. या योजने अंतर्गत




केलेल्या वृक्ष लागवडीच्या कामामध्ये शासनाने घालून दिलेल्या नियम व अटीची पूर्तता न करता काम चालू केले होते. योजनेची नियम व अटी याचा कसलाही विचार सरपंच, ग्रामसेवक, ग्राम रोजगार सेवक यांच्याकडून मस्टर ही भरण्यात आले आहेत यामुळे महाराष्ट्र शासनाच्या डोळ्यांमध्ये धुळफेक करून लाखो रुपयाचा निधी लाटण्याचा हा प्रकार ग्रामपंचायतीच्या वतीने चालवला आहे. या नियमबाह्य बेकायदेशीर कामाची चौकशी व्हावी यासाठी उकिर्डा चकला येथील मधुकर संदीपपान पानसंबळ यांनी गेल्या दोन दोन महिन्यांपूर्वी गटविकास अधिकारी शिरूर यांच्याकडे तक्रार केली होती. ◀◀ पान ३ वर

# जन्मापासून सुजाण नागरिक बनवण्यासाठी धडपडणाऱ्या आई वडीलांचे ऋण फेडा-वसंत हंकारेंची विद्यार्थ्यांना भावनिक साद

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील पोदार लर्न स्कूलला ख्यातनाम व्याख्याते वसंत हंकारे यांचे न समजलेले आईबाप या विषयावर विशेष सत्राचे आयोजन शाळेच्या वतीने मंगळवारी करण्यात आले होते. याप्रसंगी जन्मापासून मुलांना सुजाण नागरिक बनवण्यासाठी धडपडणाऱ्या आई-वडिलांचे ऋण फेडण्यासाठी सदैव तत्पर राहण्याची भावनिक साद हंकारे यांनी विद्यार्थ्यांना घातली.

आधुनिकतेच्या नावाखाली बिघडत चाललेल्या शालेय विद्यार्थ्यांच्या वैचारिक जीवनावर हंकारे यांनी भाष्य करत ज्या



आई-वडिलांनी बालपणापासून सुजान नागरिक होण्याचे संस्कार केले अशा मुलांनी आपल्या आई-वडिलांच्या नावाला कलंक लागेल असे वागू नये, मुलींनी बापाच्या इज्जतीला डाग न लागण्याचा विचार मनी बाळगावा, मोबाईल चा अतिरेक जीवनात काय दुःख देतो या बाबत सविस्तर विश्लेषण केले.

इंटरनेटच्या जमान्यात समाज माध्यमांचा होत असलेला अतिरेक कुटुंब व्यवस्था उध्वस्त करणारा ठरत आहे, आई-वडिलांचे पाल्याशी असलेले नाते बिघडण्याचे सर्वात मोठे कारण हे माध्यम ठरत असल्याची खंत सुप्रसिद्ध व्याख्याते वसंत हंकारे यांनी व्यक्त केली. या विशेष सत्राच्या अध्यक्षस्थानी पोदार लर्न स्कूलचे अध्यक्ष अतुल ठोंबरेसह, बंडू खांडेकर, राहुल ठोंबरे,माजी पंचायत समिती सदस्या सुरेखा ठोंबरे,माजी सरपंच ज्योती ठोंबरे,दिंद्रुड पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे, प्रकाश काशिद, संतोष स्वामी, नागेश वक्रे, नितीन वाघमोडे, गणेश काटकर, नवनाथ कांबळे, ज्ञानोबा कटारे, विद्यालयाचे प्राचार्य निलेश निंदाणे आदी मान्यवर उपस्थित होते.सुत्रसंचलन बिभीषण बडे यांनी तर आभार राजेंद्र पांडे यांनी मानले.

# कुरकुटे परिवारातर्फे वडवणी येथे हळदी कुंकू व होम मिनिस्टर कार्यक्रम

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी येथील,सौ.प्रियांका गणेश कुरकुटे व समस्त कुरकुटे परिवाराच्या वतीने मकर संक्रांतीच्या सणाचे औचित्य साधून सुहासिन महिलांचे सौभाग्याचं लेणं हळदी कुंकू व होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन रविवार दि.२५ जानेवारी २०२६ रोजी काळा हनुमान मंदिर वडवणी या ठिकाणी राहत्या घरी आयोजित करण्यात आला.

हळदी कुंकू व होम मिनिस्टर या कार्यक्रमाची सुरुवात वडवणी पंचायत समितीच्या माजी सभापती सौ. सुलोचनाताई आंधळे तसाच



वडवणी नगरपंचायत च्या नगराध्यक्षा सौ.वंदनाताई जगताप,माजी नगराध्यक्षा सौ.कांचनताई मुंडे,मुख्याध्यापिका सौ.शोभाताई डोईफोडे,नगरसेविका सौ.रंजना डिगे,नगरसेविका सौ.उज्वला टकले,महिला पत्रकार सौ.गिताजंली लव्हाळे,सामाजिक कार्यकर्त्या सौ.प्रमिलाताई माळी, प्रिन्सिपल ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# आमचा कोणच राहिला नाही

## काटेवाडीत दादांच्या आठवणींनी अश्रूंचा पूर

**काटेवाडी । प्रतिनिधी**

**'आमचा कोणच राहिला नाही. हक्काचा माणूस निघून गेला. आता बोलण्यात काय अर्थ आहे?' हे शब्द पवार यांच्या फार्मवर गेली ३० वर्षे काम करीत असलेल्या बापूराव पवार यांचे. पवार यांची आठवण सांगताना बापूराव पवार यांचा आवाज हुंदक्यांनी भरून येतो. अजित पवार यांचे घर, शेतीवाडी आणि फार्म पाहणाऱ्या बापूराव पवार यांना आज शब्द कमी पडत आहेत; उरल्या आहेत त्या केवळ अश्रूंनी ओलावलेल्या आठवणी.**





सकाळी नित्यनेमानं दादांशी बोलणं व्हायचंच. आईची तब्येत, शेतीवाडी, कमी-जास्त याची ते नेहमी चौकशी करायचे. माझ्या कुटुंबाचीही आपुलकीनं विचारपूस असायची. दादाच नाहीत तर आता कुणाशी बोलायचं? असे सांगताना बापूराव पवार अक्षरशः कोसळून पडतात. पहाटे पाच वाजताच दादा तयार व्हायचे. शेतावर फेरफटका मारण्यासाठी आम्ही धावतपळत त्यांच्यासोबत असायचो, अशी आठवण ते सांगतात.

शेतीवर दादांचा विशेष जीव होता. नुकतीच एआय तंत्रज्ञानावर आधारित केळीची मोठ्या प्रमाणात लागवड त्यांनी केली होती. पारंपरिक शेतीकडे दादांचा ओढा कायम असला तरी काळानुसार बदल स्वीकारत त्यांनी ऊसशेतीतही आमूलाग्रा सुधारणा केल्या. शेतात फेरफटका मारताना ते परिसरातील शेतकऱ्यांना थांबवून आपुलकीने चौकशी करायचे. राजकारणाच्या व्यापातूनही वेळ काढून दादा रोज शेतीची माहिती घेत असत. शेतीसोबतच देशी गायींचे पालन, पोगणूर जातीच्या गायी, स्वच्छता आणि टापटिप यावर दादांचा विशेष कटाक्ष होता. दरवर्षी भाद्रपद पोळ्यानिमित्त ते वेळात वेळ काढून बैलपोळा मोठ्या आनंदात साजरा करायचे. वहिनी, आईसाहेब, शेतमजूर कुटुंबे मुलाबाळांसह सहभागी व्हायची. 'यापुढं आम्ही बैलपोळा कसा साजरा करायचा,' असे म्हणत पुढचे शब्द त्यांच्या तोंडातून फुटलेच नाहीत; हुंदका अनावर झाला.

दादांचा आईसाहेबांवर खूप जीव होता. सकाळी टीव्हीवर विमान दुर्घटनेची बातमी पाहून आईसाहेब अस्वस्थ झाल्या. दादांना भेटायला दवाखान्यात जाऊया, असे त्या म्हणाल्या. त्या प्रेमाची खोली शब्दांत मांडणं कठीण असल्याचं त्यांनी सांगितलं. काटेवाडी गावातील ज्येष्ठ नागरिक, नानासाहेब काटे, बाळकृष्ण काटे, हरिभाऊ वाघ, राजाराम जाधव यांनीही भावना व्यक्त केल्या. दादा आमचा जीव होते. त्यांच्याबद्दल काय सांगू. बळच उरलेलं नाही, असे ते म्हणाले. बाळासाहेब काटे यांनी राजकारणात येण्याच्या अगोदरची दादांची आठवण सांगताना पाणीटंचाईच्या काळातील प्रसंग उलगडला. शेतकऱ्यांवर होणारा अन्याय दादांनी थेट पाटबंधारेमंत्र्यांकडे मांडून प्रश्न सोडवला होता. आज काटेवाडी सुन्न आहे. गाव बोलत नाही, गाव रडत आहे. 'आमचा दादा' हरपला आहे. त्यामुळे गाव सुन्न आहे.





## शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांनी घेतली सुनेत्रा पवार यांची भेट, काँग्रेस नेतेही भेटीसाठी

पुणे । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रसचे नेते अजित पवार यांच्या अकाली निधनाने राज्याच्या राजकीय वर्तुळातही मोठी पोकळी निर्माण झाली आहे. काल झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले. यानंतर सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. आज बारामतीत शासकीय इतमामात अजित पवार यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. लाखोंचा जनसागर अजितदादांना अखेरचा निरोप देण्यासाठी उपस्थित होता. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या सर्वच प्रमुख नेत्यांनी खासदार सुनेत्रा पवार यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली.

आमदार जयंत पाटील, अनिल देशमुख, हर्षवर्धन पाटील, शशिकांत शिंदे या सगळ्या नेत्यांनी खासदार सुनेत्र पवार यांची भेट घेतली. त्याचबरोबर काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी देखील सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. त्याचबरोबर धैर्यशील मोहिते पाटील यांनी देखील सुनेत्रा पवार यांची भेट घेतली आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे सर्वच मोठे नेते उपस्थित होते.

## अजितदादा यांचं जाणं महाराष्ट्रासाठी मोठी हानी - मुरलीधर मोहोळ

पुणे: महाराष्ट्र राज्याचे कणखर, कार्यक्षम आणि खमके नेतृत्व लाभलेले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचं अकाली निधन अत्यंत दुर्दैवी आणि मनाला खोल वेदना देणारं आहे. अजितदादा आपल्यातून निघून गेले आहेत, ही गोष्ट मन अजूनही स्वीकारायला तयार नाही. कोरोना संकटात त्यांनी पक्षीय भिंती बाजूला ठेवून पुणे शहरातील परिस्थिती, उपाययोजना आणि निर्णयप्रक्रियेबाबत सातत्याने संवाद साधला, अशा भावनिक शब्दांत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाबद्दल शोक व्यक्त करत श्रद्धांजली वाहिली.



मोहोळ म्हणाले, माझ्याकडे पुण्याच्या महापौरपदाची जबाबदारी असताना माननीय अजितदादांशी माझा निकटचा आणि आपुलकीचा संबंध निर्माण झाला. त्या काळात उद्भवलेल्या कोरोना संकटात त्यांनी पक्षीय राजकारण बाजूला ठेवून पुणे शहरातील परिस्थिती, उपाययोजना आणि निर्णयप्रक्रियेबाबत सातत्याने संवाद साधला. अनेक महत्त्वाच्या निर्णयांमध्ये त्यांनी मला विश्वासात घेतलं. हे नातं नंतरच्या काळातही कायम राहिलं.मोहोळ म्हणाले, अगदी अलीकडच्या काळात पार पडलेल्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या निवडणुकीतही आदरणीय अजितदादांनी सामोपचाराची भूमिका घेतली. नुकत्याच झालेल्या पुणे महापालिका निवडणुकीदरम्यान आमच्यात आरोप-प्रत्यारोप झाले असतील. मात्र, एकमेकांबद्दल द्वेषाची भावना कधीही नव्हती आणि मनभेदही नव्हते. अजितदादा पवार यांचं जाणं हे महाराष्ट्रासाठी शब्दशः मोठी हानी आहे. आदरणीय अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## माझे आयुष्यच थांबले : अजित पवार यांचे चालक श्यामराव मणवे भावूक

**बारामती । प्रतिनिधी**

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मोटारीचे १९९९ पासून सारथ्य करणारे चालक श्यामराव नारायण मणवे यांनी अजितदादांच्या अपघाती निधनाबद्दल कमालीचा शोक व्यक्त केला.**




ते म्हणाले, मंगळवारी दादांच्या मीटिंग लवकर संपल्या होत्या. त्यामुळे मी दादांना आपण रात्रीच कारने पुण्यात जाऊ, असे म्हणालो होतो. पण, दादा म्हणाले की, सकाळी विमानाने जातो. मी बारामतीच्या सभा आटोपून पुण्यात येतो, तू पुण्यात ये. पण, बुधवारी सकाळीच ही दुर्दैवी दुघर्टना घडली आणि अक्षरशः आकाश कोसळले. माझे आयुष्यच थांबले.

ते म्हणाले, मी दादांकडे २० जानेवारी १९९९ पासून चालक म्हणून सोबत आहे. दादा माझे दैवत होते. ते माझ्या घरी गणपतीला जेवायलासुद्धा आले होते. २०१३ मध्ये मी शासनसेवेतून निवृत्त झालो. तेव्हापासून आजवर दादांकडेच काम करीत होतो. सकाळी साडेसातला दादा मुंबईतील बंगल्यातून निघाले आणि काही वेळातच ही बातमी समजली. माझ्या आयुष्यातील सर्वस्व गमावल्यासारखे आता वाटते आहे. मंगळवारी रात्रीच आम्ही पुण्यात मुक्कामी आलो असतो, तर कदाचित ही घटना घडली नसती, असे म्हणत त्यांनी आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली.

## बारामतीचा ढाण्या वाघ गेला अन् मावळची 'रुपलेखा' मावळली; एकाच दिवशी २ दिग्गज हरपले

मावळ । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणात आज दुहेरी शोकाची लाट पसरली आहे. एकीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात (२८ जानेवारी) निधन झाले,



तर दुसरीकडे मावळ तालुक्यातील पहिल्या महिला आमदार रुपलेखा खंडेराव ऊर्फ दादासाहेब ढोरे (वय ७६) यांचे बुधवारी अल्पशा आजाराने निधन झाले. या दोन्ही घटनांमुळे पुणे जिल्ह्यातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळात गहिरा शोक पसरला आहे.

मावळ तालुक्यातील पहिल्या महिला आमदार रुपलेखा ढोरे यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात स्थानिक स्वराज्य संस्थांमधून केली. १९९३ ते १९९५ या कालावधीत त्यांनी मावळ पंचायत समितीच्या उपसभापतीपदाची जबाबदारी सांभाळली. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांच्या राजकीय कारकिर्दीला निर्णायक वळण मिळाले. त्या आणि त्यांचे पती खंडेराव ढोरे यांनी काँग्रेस सोडून भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. भाजपने मावळ मतदारसंघातून उमेदवारी दिली आणि त्यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मदनशेठ बाफना यांचा पराभव करून मोठा धक्का दिला. या विजयासह रुपलेखा ढोरे मावळ तालुक्यातील पहिल्या महिला आमदार आणि भाजपच्या पहिल्या आमदार ठरल्या. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, दोन मुली, सुना, पुतणे आणि नातवंडांचा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने मावळ तालुक्यातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली असून, अनेकांनी श्रद्धांजली वाहिली आहे.

## देशातील पहिली सोडियम बॅटरी तयार; पहिल्या टप्यात दुचाकी, तीनचाकी वाहनांसाठी उपलब्ध होणार

पुणे : देशातील पहिली सोडियम बॅटरी पुण्यात तयार झाली असल्याचा दावा शास्त्रज्ञांनी केला आहे. ही बॅटरी एआरएआय (ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया )च्या वतीने आयोजित प्रदर्शनात प्रथमच प्रदर्शित करण्यात आली. त्यामुळे लवकरच दुचाकी, तीनचाकी वाहनांसाठी ती बाजारात येऊ शकेल.




भारतात अशा प्रकारची बॅटरी पहिल्यांदाच तयार करण्यात आली आहे. या संशोधनाला केंद्रीय अवजड उद्योग मंत्रालयाच्या अखत्यारीत काम करत असलेल्या ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया ( एआरएआय )ने मान्यता दिली आहे. ही संस्था देशातील वाहन उद्योगाची प्रमाणन, संशोधन व विकास संस्था आहे. ही बॅटरी एआरएआयच्या वतीने मोशी येथील पुणे इंटरनॅशनल एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटर (पीआयईसीसी) येथे आयोजित केलेल्या 'सिम्पोझियम ऑन इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह टेक्नॉलॉजी या प्रदर्शनात ठेवण्यात आली आहे.

पुढील आठ ते नऊ महिन्यांत ही बॅटरी भारतीय बाजारपेठेत उपलब्ध होणार असल्याची माहिती बॅटरी विकसित करणाऱ्या रिचार्जीयन एनर्जी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विलास शेळके यांनी दिली. ही कंपनी पाषाण येथील केंद्र सरकारच्या राष्ट्रीय रासायनिक संस्थेच्या ( एनसीएल ) इनोव्हेशन पार्कमध्ये कार्यरत आहे.

संशोधनासाठी उभारला ४ कोटींचा निधी

एआरएआयच्या 'टेक्नोव्हस' या खास वाहन उद्योगातील स्टार्टअपसाठी असलेल्या व्यासपीठाच्या माध्यमातून रिचार्जीऑन एनर्जी या कंपनीला लिथियम बॅटरीला पर्याय म्हणून सोडियम आयन बॅटरी तयार करण्यासाठी सुरुवातीला आवश्यक मदत व काही निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यानंतर केंद्रीय अवजड उदयोग मंत्रालय, इंडो यूएस प्रोग्राम आणि युनायटेड नेशन यांच्याकडून ही बॅटरी विकसित करण्यासाठी सुमारे ४ कोटी रुपये इतका संशोधन व विकास निधी उपलब्ध करून देण्यात आला असल्याचे डॉ. शेळके यांनी सांगितले.

## मद्यधुंद स्कूल बस चालकाची अनेक वाहनांना धडक; वाघोलीमधील बाईफ रोड वादाच्या भोवऱ्यात

पुणे । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील वाघोली परिसरात काल दुपारी अडीच ते पावणे तीन वाजण्याच्या सुमारास एक भीषण आणि धक्कादायक अपघात घडला. इंडो स्कॉट ग्लोबल स्कूलची (बायफ रोडवरील) स्कूल बस चालवताना बसचालक मद्यधुंद अवस्थेत होता.या बसने रस्त्यावरून जात असताना चार दुचाकीस्वार आणि एका कारला जोरदार धडक दिली. धडकेनंतर बसने या वाहनांना काही अंतर फरफटत नेल्याची माहिती समोर आली आहे.



या अपघातात सुदैवाने कोणत्याही व्यक्तीला गंभीर जखम झाली नाही किंवा जीवितहानी झाली नाही. बसमध्ये ३० ते ४० विद्यार्थी होते, ज्यांना घेऊन चालक घरी सोडण्यासाठी निघाला होता. मात्र, मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवल्याने ही घटना घडली, ज्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ प्रतिसाद दिला. ते ओरडा-ओरडा करत बसच्या मागे धावले आणि बस थांबवली. संतप्त झालेल्या नागरिकांनी बसचालकाला चोप दिला आणि त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले. गर्दी जमली आणि काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी बसचालक बत्ता वसंत रसाळ (वय ५० वर्षे, रा. वाघोली) याला तात्काळ अटक केली आहे. या प्रकरणी पोलिस कर्मचारी प्रशांत भगवान धुमाळ (वय ३६) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्याच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. स्कूल बस चालकांनी मद्यपान करून वाहन चालवणे हे अत्यंत गंभीर आणि अस्वीकार्य आहे. अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी स्कूल प्रशासनाने चालकांची नियमित तपासणी, ब्रेथलाइझर चाचणी आणि फिटनेस प्रमाणपत्रांची काटेकोर तपासणी करणे आवश्यक आहे. पालक आणि नागरिकांनीही अशा घटनांबाबत सजग राहून तक्रार नोंदवणे गरजेचे आहे.

# बारामती विमान अपघात: खासगी चार्टर विमान सुरक्षेवर तज्ज्ञांनी उपस्थित केले प्रश्न

पुणे । प्रतिनिधी

बारामती विमानतळावरील अपघातामुळे खासगी विमान कंपन्यांच्या क्रू क्षमता, प्रशिक्षण, देखभाल आणि चार्टर ऑपरेशन्सच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत, असे मत हवाई वाहतूकतज्ज्ञ धैर्यशील वंडेकर यांनी व्यक्त केले.

टेबलटॉप रनवे असलेल्या बारामती विमानतळावर लँडिंग करताना अपघात होऊन लागलेल्या आगीत विमान नष्ट होऊन विमानातील सर्वांचा मृत्यू होणे, ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. संभाव्य कारणांमध्ये खराब दृश्यमानता व अशा दृश्यमानतेत विमान उतरवण्याचा वैमानिकाचा चुकलेला निर्णय, लँडिंग करताना त्यांचा अंदाज चुकणे, विमानाच्या नियंत्रणातील त्रुटी, विमानात झालेला यांत्रिक बिघाड, क्रू फटिग चा निर्णय क्षमतेवर परिणाम या सारख्या व इतर अनेक कारणांचा समावेश असू शकतो. या विमानाचे ऑपरेटर व्हीएसआर



एव्हिएशन असून, २०२३ मध्ये याच कंपनीच्या दुसऱ्या लिअरजेटचा मुंबईत अपघात झाला होता, असेही हवाई वाहतूक तज्ज्ञ धैर्यशील वंडेकर यांनी सांगितले.

अपघाताच्या खऱ्या कारणांचा शोध घेण्यासाठी हवाई अपघातांची चौकशी करण्याची जबाबदारी असलेल्या सरकारच्या एअरक्राफ्ट एक्सीडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो यांची स्वतंत्र चौकशी सुरू आहे. त्यांचा अंतिम अहवाल येईपर्यंत कोणत्याही प्रकारचे अनुमान काढणे किंवा कोणावर दोषारोपण चुकीचे होईल व तसे करणे पूर्णपणे टाळले पाहिजे. असे अंदाज चुकीची माहिती पसरवतात, त्यांचा पीडितांच्या कुटुंबीयांना अतिरिक्त त्रास होऊ शकतो, हवाई वाहतुकीच्या विश्वासाहर्तेवर परिणाम करण्याबरोबरच चौकशी प्रक्रियेत अडथळे निर्माण करू शकतात. भारताच्या हवाई वाहतूक क्षेत्राचा झपाट्याने विकास होत असताना देशात अशा दुर्घटना घडणे या क्षेत्रासाठी हानिकारक आहे. या दुर्घटनेतून सरकारने गंभीर धडे घ्यावयास हवेत. बारामती व त्यासारख्या देशातील इतर प्रादेशिक आणि अनियंत्रित विमानतळांवर हवाई वाहतुकीची सुरक्षितता राखण्यासाठी रनवे सुरक्षा क्षेत्र, नेविगेशनल एड्स, हवामान निरीक्षण उपकरणे व प्रणाली, आपत्कालीन अग्निशामन, रेस्क्यू सुविधा व इतर आवश्यक पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी सरकारने तातडीने पावले उचलावयास हवीत. चार्टर आणि नॉन-शेड्यूल्ड ऑपरेटर्सवर उड्डाणांसाठी कडक निरीक्षण, नियमित ऑडिट, क्रू फटिग मॅनेजमेंट आणि सिम्युलेटर आधारित प्रशिक्षण अधिक सक्त होणे गरजेचे आहे. डीजीसीए मधील तज्ञ कर्मचाऱ्यांची संख्या, तांत्रिक क्षमता आणि स्वायत्तता वाढवण्याची अनेक दिवसांपासून मोठी गरज आहे.

## केंदुरमध्ये राष्ट्रवादीच्या पाबळ गटाकडून अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली

केंदुर: राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाबळ गटातील कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित केली. यावेळी त्यांनी आपल्या गत आठवणींना उजाळा दिला.

यावेळी बोलताना जिल्हा परिषदेचे पाबळ गटातील उमेदवार प्रफुल्ल शिवले म्हणाले की राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या अकाली मृत्यची बातमी कानी पडली व आपल्याला मोठा धक्का बसला. दादांचा राज्याच्या विकासामध्ये प्रामुख्याने पुणे जिल्ह्याच्या जडणघडणीमध्ये सिंहाचा वाटा होता. कोट्यवधी रुपयांचा निधी जिल्ह्यामध्ये आणण्यात त्यांचे योगदान मोठे होते. आमच्यासारखे अनेक छोटे मोठे कार्यकर्ते दादांच्या कार्य कर्तुत्वामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे आकर्षित झाले होते. प्रामुख्याने माझ्या पाबळ केंदुर गटात दादांनी उभे केलेले रस्त्याचे जाळे,महावितरणचे सबस्टेशन , ग्रामीण रुग्णालय, विविध विकास कामे त्यांच्या कामाची साक्ष देतात. पाबळ केंदूर गावांना वरदान ठरणाऱ्या थिटेवाडी धरणाच्या निर्मितीमध्ये ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांचे शंभर टक्के योगदान आहे.

या वेळी पवारांच्या सूचनेनंतर अजित दादा पवार हे पाबळ या ठिकाणी पहाटे साडेपाचच्या दरम्यान धरण स्थळावर पोहोचले होते. हा त्यांच्या कामाचा आवाका होता. माझ्या पक्ष प्रवेशावेळी दादांनी माझ्या बाबत संपूर्ण माहिती घेतली. माझी समाजाप्रती असलेली निष्ठा कोविड काळात केलेले काम याची दखल दादांनी घेतली व मला पक्षाची पाबळ केंदुर गटातून उमेदवारी दिली. दादांनी मला दिलेली समाजाच्या सेवेची शिकवण मी जपणार असुन या भागाच्या विकासासाठी मी जी कामे करील हीच दादांसाठी माझी भावपूर्ण श्रद्धांजली ठरेल. यावेळी बोलताना पाबळ पंचायत समिती गणातील उमेदवार वंदना प्रकाश पवार म्हणाल्या की शिरूर कृषी उत्पन्न बाजार समिती नावारूपाला आणण्यामध्ये दादांचा मोठा वाटा होता. ट्रान्सफॉर्मर, वीज, पाणी तसेच छोटे छोटे अडचणी आल्यास दादांच्या एका फोनवर कामे मार्गी लागत होती. दादांचा प्रशासनावर असलेला दबदबा यामुळे आमच्या सारख्यांची समाज उपयोगी कामे चुटकीसरशी मार्गे लागत होती. केंदुर पंचायत समिती गणातील उमेदवार सुचिता रोहन थिटे म्हणाल्या की थिटेवाडी धरण हे शरदचंद्र पवार व अजितदादा पवार यांच्या प्रयत्नातून उभे राहिले आज पारंपारिक दुष्काळी असलेल्या केंदूर गावाची पिण्याच्या पाण्याची तसेच थोड्याफार प्रमाणात शेतीच्या पाण्याची समस्या या मुळे मार्गी लागली आहे. शेतकऱ्यांप्रती त्यांची असलेली कटिबद्धता यातून अधोरेखित होत आहे.